दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक २५१ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

छत्रपती संभाजीनगरमधील मैदान परिसरातील अतिक्रमण रोखण्यासाठी कडक निर्देश : उद्योग मंत्री उदय सामंत

मुंबई : छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा परिषद कार्यालयाच्या मालकीच्या सार्वजनिक वापरासाठी असलेल्या मैदान परिसरात अतिक्रमण व अवैध धंद्यांची वाढ होऊ नये यासाठी तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश पोलीस आयुक्त आणि महानगरपालिका आयुक्त यांना देण्यात आले, असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. विधान परिषदेतील सदस्य संजय केनेकर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे मुद्दा उपस्थित केला होता. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी चर्चेत सहभाग घेतला. छत्रपती संभाजीनगर शहरातील भूमापन क्रम. ४७९६/ ब व ४७९९ या ठिकाणी असलेल्या मैदान परिसरामध्ये अतिक्रमण थांबवण्यासाठी जिल्हा परिषदेस आवश्यक त्या कारवाईसाठी सूचना देण्यात आल्या असून, सुरक्षिततेसाठी दोन बाजूंनी गेट बसविण्यात आले आहेत. तसेच, जिल्हा परिषदेमार्फत या ठिकाणी सुरक्षा रक्षकांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत मान्सूनपूर्व तयारी अंतर्गत झोननिहाय आणि प्रत्येक आरोग्य केंद्रानुसार प्रतिसाद पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

वाढवण बंदरामुळे भारताची सागरी महासत्तेकडे वाटचाल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सागरी शिखर परिषद २०२५ ला उत्स्फूर्त प्रतिसाद



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : वाढवण बंदराच्या उभारणीमुळे महाराष्ट्र आणि भारत सागरी महासत्ता होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असून, हा प्रकल्प केवळ बंदर नव्हे तर एक आर्थिक क्रांती घडवून आणणारा केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज्य शासनाच्या मत्स्य व्यवसाय व बंदरे विभाग आणि महाराष्ट्र सागरी मंडळाच्या वतीने आयोजित सागरी शिखर परिषद २०२५ चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे, परिवहन व बंदरे विकास विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उद्योग विभागाचे सचिव पी अन्बलगन, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीचे अध्यक्ष उमेश वाघ आदी उपस्थित होते.

'भारत मेरीटाईम व्हिजन २०३०'आणि'अमृतकाल मेरीटाईम व्हिजन २०४७' मध्ये महाराष्ट्राचा सहभाग

केंद्र सरकारच्या मेरीटाईम व्हिजनचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भविष्यात भारत हा जागतिक सप्लाय चेनमधला महत्त्वाचा भागीदार बनू शकतो. म्हणूनच केंद्र सरकारने 'इंडिया मेरीटाईम व्हिजन २०३०' आणि 'अमृतकाल मेरीटाईम व्हिजन २०४७' तयार केले आहेत. या दोन्ही व्हिजनचा अभ्यास करून, महाराष्ट्रासाठी एक मजबूत मेरीटाईम व्हिजन तयार करण्याचे आपले उद्दिष्ट आहे. या धोरणासाठी आजच्या चर्चासत्रातील सर्व शिफारशी संकलित करून आम्ही त्या अमलात आणू.

मुंबई ही आपली आर्थिक, व्यावसायिक, मनोरंजन आणि आर्थिक राजधानी आहे. मुंबईला भारताचे आर्थिक इंजिन बनवणारे मुंबई पोर्ट आणि जेएनपीटी पोर्ट ही बंदरे आहेत. ही दोन बंदरे मुंबईला आघाडीवर घेऊन आली. आता आपण जागतिक सप्लाय चेनमध्ये शक्ती बनण्याचा संकल्प करत आहोत, त्यामुळे बंदरांची क्षमता, कार्यक्षमता आणि कनेक्टिव्हिटी वाढवावी लागेल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात आमचे सरकार आल्यावर वाढवण बंदरासाठी पुन्हा नव्याने प्रयत्न हाती घेण्यात आले. प्रारंभी प्रकल्प १००इ महा पोर्टकडे होता, परंतु, त्याचा व्याप पाहता केंद्र सरकारला प्रमुख भागीदार करण्यात आले. वाढवण बंदर पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवेल. भारत सध्या जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे आणि महाराष्ट्र हे नेतृत्व करण्यास तयार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

ऑफशोअर विमानतळ आणि मल्टिमोडल कनेक्टिव्हिटी

भारताचे पहिले 'ऑफशोअर विमानतळ' वाढवण बंदराशेजारी उभारले जात आहे. यामुळे जलमार्ग, रेल्वे, रस्ता आणि हवाई मार्गांची मल्टिमोडल जोडणी मिळेल. यासाठी सागरमाला प्रकल्पांतर्गत केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. महाराष्ट्रात जलवाहतूक, शिपबिल्डिंग आणि शिप रीसायकलिंगसाठी मोठी संधी आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

वाढवण बंदराला जोडणारे रेल्वे जाळे तयार करण्याचाही प्रयत्न करत करण्यात येत आहे. सागरमाला प्रकल्पामुळे ही कनेक्टिव्हिटी खूपच सोपी झाली आहे. वाढवण पोर्टवर मल्टी-मोडल कार्गो हाताळणी क्षमता निर्माण होईल. नॉन-मेजर पोर्ट्सही अधिक कार्यक्षम बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कारण त्यांचेही महत्त्वाचे योगदान आहे. भविष्यात आपण केवळ कार्गो हाताळणीपुरते मर्यादित राहणार नाही, तर शिपबिल्डिंग, शिप रीसायकलिंग, वॉटर ट्रान्सपोर्टच्या दिशेने जाऊ शकतो. महाराष्ट्रात विशेषतः मुंबई-नवी मुंबई भागात जलवाहतुकीची खूप मोठी संधी आहे. यामुळे नागरिकांचे जीवनमान खूप सुकर होऊ शकते, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

समृद्धी महामार्गमुळे जलद मालवाहतूक आणि २४ जिल्ह्यांचा थेट लाभ

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समृद्धी महामार्गामुळे १५-१६ जिल्ह्यांना जेएनपीटी बंदराशी जलद जोडणी मिळाली असून, जिथे माल पोहोचण्यासाठी ६-७ दिवस लागत होते, तिथे आता तो प्रवास १० तासांपेक्षा कमी वेळेत होतो. वाढवण बंदरालाही '?क्सेस कंट्रोल्ड' रस्त्यांद्वारे समृद्धी महामार्गाशी जोडण्यात येत आहे, ज्यामुळे २४ जिल्ह्यांना थेट बंदर कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.

कोकणातील पारंपरिक बंदरांचा इतिहास सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोकणातील काही बंदरे ५००-६०० वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी प्रसिद्ध होती. त्या गौरवशाली इतिहासाला पुन्हा उजाळा देत आहोत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि ती बंदरांमुळे आर्थिक इंजिन झाली आहे.

महाराष्ट्राला मेरीटाईम क्षेत्रात आघाडीवर नेणारे पाऊल - बंदरे विकास मंत्री नितेश राणे

यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे म्हणाले की, मेरिटाईम समिट हे शिखर संमेलन केवळ एक कार्यक्रम नाही, तर महाराष्ट्राला देशाच्या मेरीटाईम क्षेत्रात आघाडीच्या स्थानी नेण्यासाठी घेतलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली, भारत जागतिक मेरीटाईम हब होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिशील नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या समुद्रकिनारपट्टी आणि मेरीटाईम क्षमतेचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी दिशा मिळाली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सागरी किनारपट्टीचा वापर करत बंदराधिष्ठित विकास, सागरी उत्पादन आणि किनारपट्टी वाहतुकीस चालना दिली आहे. महाराष्ट्र हे भारताच्या आर्थिक प्रगतीचे इंजिन आहे. अरबी समुद्र ही केवळ आपली भौगोलिक सीमा नाही, तर ती एक संधीने भरलेली अमर्याद शक्ती आहे, असे मंत्री राणे यांनी सांगितले.

आपला दृष्टिकोन केवळ क्षमतेच्या वाढीपुरता मर्यादित नाही, तर तो शाश्वततेवर आधारित आहे. ग्रीन लॉजिस्टिक्स, मल्टीमोडल इंटिग्रेशन, आणि किनारी समुदायांचे सबलीकरण हे सागरी धोरणाचे मुख्य भाग आहेत. आज महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प म्हणजे वाढवण बंदर. हे कार्यान्वित झाल्यावर, जगातील सर्वोच्च १० खोल समुद्र बंदरांपैकी एक ठरेल. येथे उच्च दर्जाचे कंटेनर हाताळणी, खोल पाण्याची उपलब्धता आणि जागतिक दर्जाची लॉजिस्टिक्स सुविधा असेल. हे बंदर महाराष्ट्रासाठीच नाही, तर भारताच्या जागतिक व्यापारातल्या भूमिकेसाठीही गेमचेंजर ठरेल, असा विश्वास मंत्री राणे यांनी यावेळी व्यक्त केला.

नेदरलँड्स दौऱ्यामुळे आंतरराष्ट्रीय संधी खुल्या झाल्या आहेत. या दौऱ्यात अनेक संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येणार आहे. तसेच राज्यातील सहा 'आयटीआय'चे आधुनिककरण होणार असून त्याद्वारे दरवर्षी ७,००० युवकांना आधुनिक सागरी कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र सरकारने 'शिपबिल्डिंग, शिप रिपेअर व शिप रीसायकलिंग पॉलिसी २०२५' जाहीर केली. या धोरणांतर्गत प्रकल्पांना भांडवली अनुदान, कौशल्य विकासासाठी वित्तीय प्रोत्साहन, जलद परवानगी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

महाराष्ट्र भारताच्या मेरीटाईम परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी तयार असून आपल्याकडे धोरण, जमीन, पायाभूत सुविधा आणि नेतृत्व आहे. आता भागीदार हवे असून यासाठी हे समिट महत्वाचे असल्याचे मंत्री राणे यांनी सांगितले. सेठी यांनी प्रास्ताविकात राज्यातील बंदर विकासात करण्यात येत असलेल्या पायाभूत सुविधा, कनेटीव्हीटी याबद्दल माहिती दिली.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला रुग्णांसाठी जीवनदायी !

मागील सहा महिन्यात ५८७ रुग्णांना ४ कोटी ९० लाखांची मदत

वृत्तसंस्था ■ अहिल्यानगर

अहिल्यानगर : जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आशेचा नवा किरण ठरला आहे. गेल्या पाच महिन्यांत या निधीच्या माध्यमातून जवळपास ४ कोटी ८९ लाख ९३ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य रुग्णांना देण्यात आले असून उपचारासाठी पुरेसा आर्थिक आधार नसलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात १ मे २०२५ रोजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या कक्षात दाखल अर्जांची तातडीने पडताळणी करून ते मुंबईकडे पाठवले जातात. कक्षाचे काम डॉ. निळकंठ ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य स्वप्निल कच्छवे व वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक अजय काळे यांच्या देखरेखीखाली सुरु आहे.

या निधीतून कर्करोग, हृदयविकार, मेंदूविकार, नवजात बालकांचे गंभीर आजार, मूत्रपिंड व लिव्हर प्रत्यारोपण, अपघातातील शस्त्रक्रिया, महागड्या ऑर्थोपेडिक शस्त्रक्रिया अशा गंभीर व जीवघेण्या आजारांवरील उपचारासाठी मदत दिली जाते. याशिवाय, मदत न मिळाल्यास महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम यासारख्या पर्यायी योजनांची माहितीही रुग्णांना देण्यात येते. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर, निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी कार्यरत असून नागरिकांनी थेट येथे संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. ठाकरे यांनी केले आहे.

सन २०२५ या वर्षात मागील सहा महिन्यात रुग्णांना देण्यात आलेली मदत

जानेवारी - ३२ अर्जांना २४ लाख ६५ हजार रुपये, फेब्रुवारी - २८ अर्जांना २२ लाख ७५ हजार रुपये, मार्च - ४३ अर्जांना ३२ लाख २५ हजार रुपये, एप्रिल - २९ अर्जांना २४ लाख ७० हजार रुपये, मे - ३२ अर्जांना २४ लाख ६५ हजार रुपये, जून - ३२० अर्जांना २ कोटी ७३ लाख ६३ हजार रुपये, १३ जुलैपर्यंत - १०३ अर्जांना ८७ लाख ३० हजार रुपये, १ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात कक्ष सुरू झाल्यानंतर मदतीच्या प्रमाणात जवळपास चारपट वाढ झाली आहे, हे विशेष उल्लेखनीय आहे. रुग्ण दवाखान्यात भरती झाल्यानंतर दोन दिवसांत अर्ज दाखल केल्यास व कागदपत्रे पूर्ण असल्यास पाच दिवसांतच निधी संबंधित रुग्णालयाच्या खात्यात जमा होतो. सध्या जिल्ह्यातील १०५ नोंदणीकृत रुग्णालयांमधून हा निधी मिळवता येतो.

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया :अर्जदारांनी निधीसाठी अर्ज करताना काही आवश्यक कागदपत्रे जमा करावी लागतात. त्यामध्ये विहित नमुन्यातील अर्ज, रुग्ण दाखल असल्याचा स्थाननिश्चित (जीओ टॅग) केलेले छायाचित्रे, उपचार खर्चाचे अंदाजपत्रक (खासगी रुग्णालय असल्यास जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र आवश्यक), तहसीलदार यांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला (१ लाख ६० हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असल्याचे), आधारकार्ड, आजाराशी संबंधित निदानात्मक कागदपत्रे तसेच अपघातग्रस्त रुग्णासाठी पोलिसांचा एफआयआर, प्रत्यारोपणाच्या बाबतीत विभागीय समितीचा अहवाल अशी कागदपत्रे बंधनकारक आहेत. अर्जदारांनी ही कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर, २ रा मजला, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षात थेट जमा करावीत किंवा ई-मेलद्वारे ("द.ऱ्ऱ्ि सुँदन.ग्रह) पाठवावीत. अर्ज केल्यानंतर मिळालेल्या नोंदणी क्रमांकाच्या साहाय्याने https://cmrf.maharashtra.gov.in/applicantEnquiryForm.action या संकेतस्थळावर अर्जाची सद्यस्थिती तपासता येते. जिल्ह्यातील गरजू रुग्णांना जीव वाचविणाऱ्या या वैद्यकीय मदत उपक्रमाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातर्फे करण्यात आले आहे.

नागपूरमधील विधानभवनाची विस्तारीत इमारत भव्यदिव्य असेल : विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : नागपूरमधील विधानभवनच्या इमारतीचे विस्तारीकरण व प्रस्तावित नव्या प्रशासकीय इमारतीच्या आराखड्याचे आज सादरीकरण करण्यात आले. विस्तारीकरण व प्रस्तावित इमारतीचे काम भव्यदिव्य असे व्हावे, असे विधानसभा अध्यक्ष ?ड. राहूल नार्वेकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले आदी उपस्थित होते. वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी आराखड्याचे सादरीकरण केले.

नागपूरमधील सध्या अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या जागेवर नवीन सात मजल्याचे संकुल उभारण्यात येणार असून हे विस्तारीकरण करताना सध्याच्या इमारतीची ऐतिहासिक शैली अबाधित राहिल, याची काळजी घेण्यात येणार आहे. विस्तारीकरणामध्ये एकाच इमारतीत सेंट्रल हॉल, विधानसभा, विधानपरिषद सभागृह, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, विधानपरिषद सभापती, विरोधी पक्ष नेते यांचे दालन आदी असणार आहेत. तर शेजारीच मंत्रिमंडळ सदस्यांसाठी वेगळी सहा मजल्याची इमारत उभारण्यात येणार आहे. तसेच वाहनतळ, उपहारगृह, अभ्यागत कक्ष, सुरक्षा कक्ष आदी सुविधा असणार आहेत. तसेच शासकीय मुद्रणालयाची जागा विधीमंडळास मिळाली असून या जागेवर मंत्रालयीन प्रशासकीय कार्यालयांसाठी सुमारे चार लाख चौ.फुटाची चौदा मजली भव्य दिव्य अशी इमारत उभारण्यात येणार आहे. विधानभवन परिसर व प्रस्तावित प्रशासकीय इमारत यांना भुयारी टनेलने जोडण्यात येणार आहे. नागपूरमधील विधानभवनाच्या इमारतीचे विस्तारीकरण व प्रस्तावित नव्या प्रशासकीय इमारतीचे काम महाराष्ट्र पायाभूत सुविधा महामंडळाच्या मार्फत करण्यात येणार आहे. महामंडळाने यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी यावेळी दिले. विधानभवनाचे विस्तारीकरण व नवीन इमारत बांधताना हरित इमारतीची संकल्पना राबविण्यात यावी. विधानभवनाच्या प्रस्तावित विस्तारीकरणामध्ये अभ्यागतांसाठी पुरेशी जागा तसेच उपहारगृहाची सोय असावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

ऊर्जा क्षेत्रातील संशोधन व सहकार्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाचा कॅलिफोर्निया विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : बर्कले येथील जागतिक कीर्तीच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाशी महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संशोधन आणि धोरण विकास क्षेत्रातील सहकार्यासंबंधी सामंजस्य करार केला आहे. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला कॅलिफोर्निया विद्यापीठाचे प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्ण बी, महापारेषणचे संजीव कुमार आदी उपस्थित होते. श्रीमती शुक्ला आणि कॅलिफोर्निया विद्यापीठाचे वरिष्ठ सल्लागार मोहित भार्गव यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

या करारामुळे महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात संशोधन, तांत्रिक नवकल्पना आणि धोरणात्मक सहकार्याला गती मिळणार आहे. ऊर्जेचा स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणारा पुरवठा, ऊर्जा साठवणूक उपाय, वीज बाजार रचना, ग्रीड प्रसारण प्रणालीतील सुधारणा, हवामानाशी जुळवून घेणारी धोरणे आणि प्रशिक्षण कार्यक्रम या क्षेत्रांमध्ये संयुक्त काम होणार आहे.

'कॅलिफोर्निया विद्यापीठासारख्या संस्थेच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात ऊर्जा क्षेत्रात जागतिक दर्जाचे संशोधन आणि नवसंशोधनाला चालना मिळेल. या सामंजस्य करारामार्फत ऊर्जा साठवणूक, वीज बाजार, प्रसारण व्यवस्था आणि हवामान बदलाशी जुळवून घेणे यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये संयुक्त संशोधन, ज्ञानाची देवाणघेवाण आणि क्षमता वृद्धी यांना चालना मिळणार आहे. स्वच्छ, विश्वासार्ह आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने सहकार्याचा नवा अध्याय सुरू होत आहे,'असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

महाराष्ट्र सरकार आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले यांच्यातील हे सहकार्य परस्पर विश्वास, समानता आणि सामूहिक हिताच्या तत्त्वांवर आधारित असून, राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील बदलत्या गरजांनुसार स्थानिक उपाययोजना विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

हा करार लवचिक स्वरूपाचा असून त्यामुळे भविष्यातील प्रकल्पांनुसार सहकार्याचे दरवाजे खुले राहतील. या करारामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि प्रशासन यांना नवसंशोधन, क्षमता वृद्धी व प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. त्यामुळे पर्यावरणस्नेही आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने राज्याचा प्रवास अधिक गतिमान होईल, असा विश्वास ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी व्यक्त केला.

या सामंजस्य करारामध्ये खालील महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये ज्ञानसंपादन, संशोधन आणि प्रशिक्षणाची संधी मिळणार

स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या वीजेचा विकास

ऊर्जा साठवण तंत्रज्ञानावर संयुक्त संशोधन

वीज मार्केटची रचना आणि धोरण निर्मिती

ग्रीड प्रसारण क्षेत्रातील नवोन्मेष

हवामान अनुकूलता (म्र्त्सूँ ाग्त्गहम) उपाययोजना

कौशल्यविकास आणि प्रशिक्षण उपक्रम

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, या खाली नमूद केलेल्या शेत जमीन मिळकती (यापुढे सदर मिळकतींचा एकत्रित उल्लेख 'सदर मिळकत' असा करण्यात आला आहे) आमचे अशील कायम खुशखरेदी/भाडेतत्वावर घेणार असून सदर मिळकतींच्या मालकांबरोबर त्याबाबत बोलणी चालू आहे. सदर जमीन मिळकतीच्या मालकांनी आमच्या अशिलांना सदर मिळकती जमीन मालकाच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस असून त्यांनी त्या मालकीहक्क ताबे वहिवाटीने धारण केलेल्या असून त्या निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा दिलेला आहे, तरी सदर शेतजमीन मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क. हितसंबध, अधिकार, सदर जमीन मिळकतीचा गहान, दान, करार, भाडेपट्टा, वक्षीसपत्र, मृत्यूपत्र, साठेखत, खरेदीखत, असाइनमेंट, अलॉटमेंट, आदलबदल, शेती वापर परवाना, प्रोबेट, उत्तराधिकार प्रमाणपत्र, वारस प्रमाणपत्र, कौटुंबिक व्यवस्था/समझोता, इनमेंट, पोटगी, हुकूमनामा, न्यायालयाचा आदेश/निर्णय, विकसनाचा हक्क, संयुक्त प्रकल्प, इत्यादि हक्क वगैरे असल्यास त्यांनी ते सदर नोटीस प्रसिद्ध आल्यापासून पुढील ७ दिवसात खाली सही करणार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अथवा वर नमूद इमेल अँड्रेस वर मेल पाठवून सर्व मूळ कागदपत्रे दाखवून समक्ष खात्री करून द्यावी व तशी लेखी पोच घ्यावी, अन्यथा सदर शेत जमीन मिळकतीबर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो स्वेच्छेने, हेतुपुरस्सर आणि जाणीवपूर्वक कायम स्वरूपी सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशील पूढील व्यवहार पूर्ण करतील. तननंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, कृपया याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. सदर मिळकत चे गट नंबर व हस्तांतरित करण्यात येणारे क्षेत्र या खालील परिशिष्ठात दिलेले आहे.

परिशिष्ट : तुकडी बोरगांव चेक- १ पोट तुकडी तालुका कारंजा (घाडगे), दुय्यम निबंधक कारंजा (घाडगे) यांचे हद्दीतील, जिल्हा परिषद वर्धा, पंचायत समिती कारंजा (घाडगे) व ग्राम पंचायत धावसा (बुद्रुक), गाव मौजे बोरगांव चेक- १, तालुका कारंजा (घाडगे), जिल्हा वर्धा या गावातील शेतजमीन मिळकती खालील प्रमाणे; गट क्र. ५८/१, गट क्र. ५८/२, गट क्र. ६६, गट क्र. ६७, गट क्र. ६८, गट क्र. ६९, गट क्र. ७०, गट क्र. ७१, गट क्र. ७२. गट क्र. ७३/१, गट क्र. ७३/२, गट क्र. ७३/३, गट क्र. ७४, गट क्र. ७५, गट क्र. ७६, गट क्र. ७७, गट क्र. ७८, गट क्र. ७९, गट क्र. ८०, गट क्र. ८१/१, गट क. ८१/२, गट क्र. ८१/३, गट क्र. ८२, गट क्र. ८३, गट क्र. ८४/१. गट क्र. ८४/२, गट क्र. ८४/३, गट क्र. ८४/४, गट क्र. ८५, गट क्र. ९६, गट क्र. ९७, गट क्र. ९८, गट क. ९९, गट क्र. १००, गट क्र. १०१, गट क्र. १०२, गट क्र. १०४ यांचे एकूण क्षेत्र ११७ हे ३८ आर येणेप्रमाणे शेतजमीन मिळकती, त्यातील सर्व हक्क, हितसंबध, जाणे-येणेचे रस्त्याचे, बहीवाटीचे, हवा-पाण्याचे सर्व हक्क, अधिकार, हितसंबंधासह काही एक राखून न ठेवता अशी दरोबस्त मिळकत.

दि. १७/०७/२०२५

ॲड. डी.के. पोद्दार
कार्यालय: बी-००१, जीएफ, प्रॉस्पेरिटी टॉवर,
सिक्का कार्मिक ग्रीन, सेक्टर - ७८, नोएडा,
राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली, पिन : २०१३०७
ईमेल:dk.poddar1970@gmail.com,
मो. नंबर ९९५८००६९१२

संपादकीय...

र...र... रसातळाचा...!

एके काळी अनेक चांगल्या गोष्टींमध्ये पुढे असलेल्या महाराष्ट्राची आज अनेक पातळ्यांवर पीछेहाट होत असताना, या स्थितीचे आकलन होऊन त्यातून वाट काढू शकेल असे राजकीय- शासकीय, प्रशासकीय पातळीवरचे पुढारपण अभावानेच दिसते. ठिकठिकाणी लोक एकमेकांना गुद्दे, ठोसे, फटके मारून कामे करून घेताहेत, हेच आपल्याला अपेक्षित आहे का? संजय गायकवाड नामक लोकप्रतिनिधीने टॉवेल आणि बनियनवर येऊन महाराष्ट्राच्या आमदार निवासातील कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याच्या तोंडावर बुक्की मारली हे चांगलेच झाले. ते ध्वनिचित्रमुद्रण सर्वदूर पोहोचल्यामुळे आपल्यावरच्या अन्यायाला वाचा कशी फोडायची असते हे इतरही लोकप्रतिनिधींना समजले असेल. त्यांनीही आता या प्रसंगातून प्रेरणा घ्यावी आणि जिथे जिथे आपल्यावर अन्याय होतो असे वाटते तेथील कर्मचाऱ्यांवर, एवढेच नाही तर अगदी रस्त्यावरील सामान्य जनतेवरही आपले हात, पाय आणि तोंड साफ करून घ्यावे. कोणाचेही वय, लिंग, लायकी काहीही बघू नये. एवढेच नाही तर आपला जन्मच या फडतूस लोकांवर राज्य करण्यासाठी आणि त्यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी झाला आहे, याबद्दल कोणाही लोकप्रतिनिधीच्या मनात उद्यापही काही संदेह उरला असेल तर त्याने यापुढच्या काळात संजय गायकवाड गुरुजींकडे सगळीकडे अधिकाधिक मनुरीने कसे वागावे याची शिकवणी लावावी. तशी ही शिकवणी देण्यासाठी २८८ जणांमध्ये आणखीही बरेच पात्र उमेदवार आहेत. पण सध्या गायकवाड गुरुजींचे नाव ताजे असल्याने त्यांचे वर्ग जोरात चालतील यात काही शंका नाही. मधुकरराव चौधरी, गणपतराव देशमुख, बाळासाहेब भारदे, भाई वैद्या, त्र्यं. ल. कारखानीस, मृणाल गोरे, केशवराव धोंगडे यांच्यासारख्या चांगल्या, अभ्यासू आमदारांची परंपरा यातून आपोआपच विसरली जाईल; मग यापुढच्या काळात कोणीही ऊठसूट विद्यामान आमदारांची त्यांच्याशी तुलना करत महाराष्ट्राची सुसंस्कृतपणाची परंपरा कशी होती आणि ती कशी हरवली आहे असले रडगाणे लावणार नाही. 'जाऊ तिथे हाणू' हा कार्यक्रम लोकप्रतिनिधींना बिनदिक्कतपणे करता येईल. यात कुणाला उद्वेग दिसेल तर कुणाला उपरोध. त्याला इलाज नाही. संतांनी, शिवाजी महाराजांनी केलेल्या मशागतीमुळे देशातले सगळ्यात सुसंस्कृत, पुरोगामी राज्य असे बिरुद मिरवणारा, फुले, आंबेडकरांची परंपरा सांगणारा महाराष्ट्र रसातळाला जाण्याची प्रक्रिया किती वेगाने सुरू आहे, याचे आज एक उदाहरण सांगावे तर उद्या नवे काही घडते. खरे म्हणजे ते सर्वच क्षेत्रांमध्ये घडते आहे, पण राजकीय क्षेत्र हे या हासपर्वाचे टोक. लोकशाही व्यवस्थेत एखादी व्यक्ती लोकप्रतिनिधी म्हणून निवडली जाऊन प्रतिनिधिगृहात जाते, ती लोकांची कामे होत राहावीत, त्यांचा आवाज सरकारदरबारी पोहोचवावा, अशी व्यवस्था असावी म्हणून. हातात जगण्याचे कोणतेच साधन नसलेल्या, बिनचेहऱ्याच्या, दीनदुबळ्या, मूक जनतेचे जगणे सुधारण्यासाठी या लोकप्रतिनिधींचे हात शिवशिवणे अपेक्षित आहे. जात, धर्म, पैशांचा अभाव यामुळे किती लोक नाडले जातात, किती जनता रोज अर्धपोटी झोपते, गरिबीमुळे किती मुले कोवळ्या वयातच जगण्याचे ओझे उचलू लागतात आणि किती मुले जगतही नाहीत या सगळ्याची आकडेवारी उपलब्ध आहे. पण यांना मात्र स्वतःला शिळे अन्न मिळाले म्हणून लगेच दुसऱ्यावर हात उचलून गुद्दागुद्दी करण्याइतका राग येतो. ते त्यांच्यावर होणाऱ्या तथाकथित अन्यायासाठी लोकप्रतिनिधी झालेले नाहीत, तर जनतेवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्यासाठी विधान भवनात पाठवले गेले आहेत, हे त्यांना खडसावून सांगण्याची वेळ आली आहे. संसद आणि विधिमंडळाच्या बैठकीवेळी खासदार - आमदारांसाठी चांदीच्या थाळीत मेजवानी झडल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने (२४ जून) दिले होते. तेव्हा यांना रेशनवर स्वस्तात मिळणारे धान्य खाऊन रोजचा दिवस कंठणाऱ्या गोरगरीब जनतेची आठवण आली होती का? तशी ती येत नाही, कारण एके काळची राजेशाही गेली असली तरी ती यांच्या सरंजामशाहीच्या रूपाने अस्तित्वात आहे. आम्हाला कोणीच हात लावू शकत नाही, या गुर्मीतून अपवाद वगळता आपले लोकप्रतिनिधी काय काय करतात, याची किती आणि काय काय उदाहरणे सांगायची? एका विद्यामान आमदारांवर एका युवतीच्या मृत्यूला कारणीभूत असल्याचा आरोप झाला होता; पण पुराव्यांअभावी क्लीन चिट मिळून ते दिमाखात मंत्री म्हणून वावरत आहेत. एका मंत्र्याला एका सरपंचाच्या खुनात सहभागी असल्याच्या आरोपामुळे मंत्रीपद सोडावे लागले. काही वर्षांपूर्वी वरळी-वांद्रे सेतूवर एका पोलीस अधिकाऱ्याने अडवले म्हणून नंतर एका आमदाराने विधानभवनात त्याला मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, संबंधित पोलीस अधिकाऱ्याविरोधात विधानसभेत हक्कभंग ठराव मांडण्यापर्यंत त्याची मजल गेली होती. या सगळ्यापुढे अन्य लोकप्रतिनिधींचे जमीन घोटाळे, सार्वजनिक बांधकामातील घोटाळे तर किरकोळ बाबी. गवगवा करून बांधलेला समृद्धी महामार्ग उद्घाटनानंतरच्या पहिल्याच पावसात नदी बनून जातो आणि अनेक वर्षे रखडलेल्या डोंबिवलीतील पलावा सिटीजवळील पुलाला उद्घाटनानंतर काही वेळातच खड्डे पडल्याचे आणि त्याचे डांबर उखडल्याचे लक्षात येते, हे वेगाने सुरू असलेल्या हासपर्वाचे नाही तर आणखी कशाचे लक्षण? पहिल्या इयत्तेपासून हिंदीची सक्ती झुगारून देण्यासाठी राज्यातली जनता रस्त्यावर उतरते, पण एके काळी 'आवाज मराठीचा' म्हणणाऱ्या आणि आता सत्तेत सामील असणाऱ्यांना आपली खुर्ची वाचवण्यासाठी हिंदी सक्तीविरोधात 'ब्र' काढण्याची इच्छा होत नाही, हे त्यांनी पाठीचा कणा बाजूला काढून ठेवल्याचे लक्षण नाही तर आणखी कशाचे? शिक्षणसम्राट, बांधकाम व्यावसायिक म्हणून वावरणाऱ्या लोकप्रतिनिधींसाठी त्यांची पदे म्हणजे हवे ते करण्याचा आणि तरीही मोकळे राहण्याचा परवानाच जणू, लोकशाही व्यवस्थेत कोणताही प्रश्न सनदशीर मार्गाने सोडवणे अपेक्षित आहे. या मार्गाने वेळ लागतोच, पण त्याला पर्याय नाही. एखादा आमदारच हा मार्ग सोडून ठोसेबाजी करणार असेल, तर त्याच्याकडे नेतृत्व म्हणून पाहणारे पुढचे लोक काय करतील? त्यांनाही हाच मार्ग योग्य वाटू लागला तर? ठिकठिकाणी लोक एकमेकांना गुद्दे, ठोसे, फटके मारून कामे करून घेताहेत, हेच आपल्याला अपेक्षित आहे का? आज मारण्यासाठी हातांचा वापर करणारे उद्या चाकूसुरे आणि परवा बंदुकांवर यायला किती वेळ लागणार आहे? अशा पद्धतीने ठिकठिकाणी रक्त सांडत आणि मुडदे पाडत आपल्याला पुन्हा मध्ययुगाकडे जायचे आहे का? कुणाला ही सगळी अतिशयोक्ती वाटेल खरी, पण महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात आज जे काही घडते आहे, ते भयकंपित करणारे आहे. एके काळी अनेक चांगल्या गोष्टींमध्ये पुढे असलेले आपले हे राज्य आज अनेक पातळ्यांवर वेगाने पीछेहाट करते आहे. या पीछेहाटीचे आकलन होऊन त्यातून वाट काढू शकेल असे राजकीय-शासकीय, प्रशासकीय पातळीवरचे पुढारपण अभावानेच दिसते आहे. राज्यकर्ते चुकत असतील तर त्यांना खडे बोल सुनावण्याची क्षमता असलेले, तसा बौद्धिक-वैचारिक दबदबा असलेले सामाजिक- सांस्कृतिक नेतृत्व आज कुठेही दिसत नाही. त्यामुळे कोणी श्रीसूक्त म्हटल्यामुळे शेतातले उत्पादन वाढते असे सांगतो तर कोणी कोट्यवधी रुपये हुंड्यात देतो आणि तरीही ती मुलगी जिवानिशी जाते. उत्तरेतून कुणी तरी बाबा येतो आणि लोकांना भजनी लावतो. किरकोळ गोष्टीसाठी मारामारी करून कुणी लोकप्रतिनिधी आपल्या कृत्याचे समर्थन करत राहतो. आता त्याच्यावर गुन्हा दाखल झाला असला तरी राज्याचे हे हासपर्व बघावे लागणे हे आपला सामूहिक प्रवास रसातळाकडे सुरू असल्याचे द्योतक.

सालंकृत देखण्या मराठीचे कोणते होते हो, आद्य स्वरूप?

डमोडी लिपी प्रथम मुद्रण दिवस विशेष



मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. तिच्या उत्पत्तीसंदर्भात अनेक सिद्धांत आहेत. २१व्या शतकातील मराठी लोकांचे असे विचार व मत आले आहे, की जर मराठी भाषेचे मूळ असलेली मोडी लिपी जर पुन्हा वापरात आणली गेली तर मराठी भाषेचा प्रभाव वाढेल. पण या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. भविष्यकाळात या विषयावर ठोस पाऊले उचलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. अलककार- श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजी ही ज्ञानवर्धक माहिती येथे देत आहेत... संपादक.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

मोडी लिपी हात न उचलता लिहिली जाते, त्यामुळे वेगाने लिहिणे सोपे जाते. यात अनेक शब्दांची लघुरुपे वापरून कमीतकमी ओळीत सारांश लिहिला जातो. यातली अक्षरांची वळणे गोलाकार असतात, त्यांमध्ये देवनागरीच्या विपरीत काना खालून वर जातो. यामुळे पुढचे अक्षर चटकन लिहिता येते. तसेच प्रत्येक अक्षराची सुरुवात आणि शेवट डोक्यावरच्या रेषेवर होते. मोडी लिपीत चिटणीसी, महादजीपंती, बिवलकरी, रानडी अशी वळणे प्रसिद्ध आहेत. पुढे घोसदार वळण येऊन त्याचा भारतातल्या इतर भागातही प्रसार झाला असे मानले जाते. असंख्य मराठी ऐतिहासिक कागदपत्रे मोडी लिपीत असून इतिहास संशोधनाकरिता मोडी जाणकारांची कमतरता भासते. मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. तिच्या उत्पत्ती संदर्भात अनेक सिद्धांत आहेत. २१व्या शतकातील मराठी लोकांचे असे विचार व मत आले आहे, की जर मराठी भाषेचे मूळ असलेली मोडी लिपी जर पुन्हा वापरात आणली गेली तर मराठी भाषेचा प्रभाव वाढेल. पण या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. भविष्यकाळात या विषयावर ठोस पाऊले उचलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

मोडी लिपीत एक पत्र सवाई माधवराव पेशवे यांनी सेनापती महादजी शिंदे यांस दि. ३०-१२-१७८४ रोजी लिहिले होते. मोडी लिपीच्या उगमाबद्दल अनेक मते व मतभेद आहेत. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे व डॉ. भांडारकरांच्या मते हेमाडपंताने ही लिपी श्रीलंकेतून आणली. परंतु चांदोरकरांच्या मते ती अशोककालातील मौर्यी- ब्राह्मीचाच एक प्रगत प्रकार आहे. वाकणकर व वालावलकरांच्या मते मोडी लिपी ही ब्राह्मी लिपीचाच एक प्रकार असून हात न उचलता लिहिण्याच्या तिच्या वैशिष्ट्यामुळे इतर लिपींपेक्षा वेगळी झाली आहे. ती श्रीलंकेतून आणली गेली असावी अथवा मौर्यी लिपीवरून विकसित झाली असावी, हे म्हणणे त्यांना मान्य नाही. ही लिपी महाराष्ट्रात कमीत कमी ९०० वर्षे वापरात आहे. सर्वांत जुना उपलब्ध मोडी लेख इ.स. ११८९ मधील आहे. ते पत्र पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहात आहे. ती अल्पप्रमाणात का होईना सन १९५०पर्यंत लिखाणात प्रचलित होती. शेवटच्या २-३ शतकात या लिपीत अनेक फेरबदल झालेले आहेत. साधारण इ.स. १७००च्या सुमारास चिटणिसी आणि वळणे ही पूर्णपणे प्रगत झाली. यानंतर त्यात फारसे बदल दिसून येत नाहीत. ऐतिहासिक कागदपत्रांतील ही लिपी क्लिष्ट आणि वाचण्यास कठीण असते. ती पेशवाईकाळात अत्यंत उत्कर्षावस्थेत होती, असे मानले जाते. पेशवे यांच्या दप्तरातील कागदपत्रे, दस्ताऐवज पाहिले असता त्या उत्कर्षाची कल्पना येते. सुबक अक्षर, दोन ओळीतील समान अंतर, काटेकोर शुद्धलेखन हे या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ ते उत्तर पेशवाई या काळांतील मोडीवाचनातून मराठी भाषेतील स्थित्यंतरे लक्षात येतात व मराठी भाषेचा प्रवास अभ्यासता येतो. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मताप्रमाणे ज्ञानेश्वरी लिहिली जाण्याच्या काळात मोडी संकल्पना महाराष्ट्रात येत होती. याच काळात पहिले मुस्लिम आक्रमण भारतात होत होते. लिखाणाकरिता कागदाचा वापर हा मुस्लिमांनी भारतात सुरू केला असावा, कारण कागज हा फार्सी शब्द असून या अर्थाचा संस्कृत शब्द अस्तित्वात नाही. इतिहासाचार्य राजवाडे ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा हवाला देतात. देवनागरी अक्षरे आडव्या, उभ्या आणि टोकदार रेषांचा अवलंब करतात, त्यामुळे लिखाणाच्या हस्तलिखित प्रति बनवताना वेग कमी होतो. तर शिकस्तप्रमाणे गोलाकार व एकमेकांना जोडली जाणारी वळणे वापरून मोडी हस्तलिखिताचा वेळ वाचवत होती. विराम चिन्हांचा वापर इंग्रजी भाषाशी ओळख झाल्यानंतरच भारतीय लिपींत सुरू झाला.

भारतीय टपाल सेवेच्या माय स्टँप योजने अंतर्गत मोडी लिपी राखण्यास एक प्रयत्न केला आहे. चित्रात मराठी हे मोडी लिपीमध्ये छापले गेले आहे. ती १३व्या शतकापासून २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी होती. महादेव यादव व रामदेव यादव यांच्या राज्यकालात- १२६०-१३०९मध्ये हेमाडपंत- खरे नांव हेमाद्रि पंडित या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला. छपाईस अवघड असल्यामुळे मोडी लिपीचा वापर मागे पडला आणि बाळबोध- देवनागरी लिपीचा वापर सार्वत्रिक सुरू झाला. हा वापर सक्तीने करण्याची सुरुवात ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यानंतर मात्र दि. १७ जुलै १८०२ रोजी मोडी लिपीतून पहिल्यांदाच मुद्रण करण्यात आले. म्हणूनच आजचा १७ जुलै हा दिवस मोडी लिपीचा प्रथम मुद्रण दिन दरवर्षी साजरा होतो. इ.स. १८०२मध्ये विल्यम कॅरे या मिशनऱ्याने पंडित वैजनाथ यांच्या मदतीने पहिला मोडी लिथोग्राफ श्रीरामपूर बंगाल येथे बनवला. रघु भोसल्यांची वंशावळी, मराठी भाषा व्याकरण, मराठी कोष, नवा करार सन- १८०७. या ग्रंथांची मोडी लिपीत छपाई केली गेली. ए.के. प्रियोळकर यांनी मोडी छपाईचा इतिहास लिहिला. मोडी लिपीचे चार कालखंडांत वर्गीकरण केले आहे- यादवकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन आणि आंग्लकालीन. यादवकालीन मोडी लिपी लिखाणात अक्षरे एकमेकांच्या अगदीच जवळ व उभी काढली गेली. तीच शिवकालीन शैलीत किंचित उजवीकडे झुकलेली दिसतात. या लिपीला तिरकस वळण, अधिक वर्तुळाकार आणि सुटसुटीत अक्षरे लिहिण्याचा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी सुरू केला होता. तोपर्यंत लिपी ही टाकाने लिहिली जात असे. असाच प्रयत्न पुढे चालू ठेवून पेशवेकालीन शैलीत ती अगदीच रेखीव, गोलाकार, तिरकस आणि सुटसुटीत लिहिली जाऊ लागली. पेशवेकाळातील लिखाण बोरूने होत असे. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज राजवटीत फाऊंटन पेनचा वापर सुरू झाला. बोरूने जी प्रत्येक अक्षराला जाडी-रुंदी आणि टोक येत असे, ते या फाऊंटन पेनच्या वापरात शक्य नसल्याने मोडी लिपी अगदीच गुंतागुंतीची व किचकट दिसू लागली. फाऊंटन पेनचा एकच फायदा होता, तो म्हणजे त्यात शाई बराच वेळ टिकून राही. म्हणून सध्याचे मोडी लेखक फाऊंटन पेनच्या कॅलिग्राफीच्या निब्सचा वापर करतात आणि लिखाणात काही प्रमाणात पेशवेकालीन मोडी लिपीचे सौंदर्य आणण्याचा प्रयत्न करतात.

अलीकडे कर्नाटकात ९व्या शतकातील काही आढळलेले शिलालेख हे मोडी लिपीत असून लिपी शिकस्तामधून निर्माण झाली, या मताचे खंडण करतात. १०व्या शतकात नस्तलीकमधून शिकस्ते लिपी जन्मास आली. शिकस्ता म्हणजे मोडकी नस्तलीक होय. यावरून स्पष्ट होते की मोडी लिपीची संकल्पना ही शिकस्तामधून आली नव्हती. कारण महादेवराव, रामदेवराव किंवा हरपालदेवराव यादवांच्या कारकिर्दीत मराठी लोकांचा श्रीलंकेशी संपर्क आला नव्हता. मात्र मोडी लिपीचे नागरी, गुर्जरी म्हणजे महाजनी आणि बंगाली लिप्यांशी साधर्म्य आहे, हे कोणीही ठामपणे सांगू शकेल.

!! मोडी लिपी प्रथम मुद्रण दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

बर्थ डे...

वाढदिवससाहेबांचा
पारावार ना आनंदा
तयारी करे कार्यकर्ते
खुश करावे खाविंदा

पोस्टर लावा मोठाले
कित्येकांचा पोशिंदा
कळू द्यायचे सर्वांना
टायगरअभी रे जिंदा

दमबाजीपुष्कळ करे
जमला बक्कळ चंदा
तिजोरी भरली गच्च
कार्यकर्ता असे खंदा

उत्तानी कटील डान्स
ठेवायचा बरका यंदा
बिबत्स सर्वांना प्रिय
खेळ करायचा गंदा

जेसिबी भरभरू फुले
शेतकरी लुटा एखादा
हपापाचा मालगपापा
निर्माल्य होई चिकदा

हॉटेल टपरी वाल्यांना
लावा कायम तकादा
फुकटात चहा नास्ता
पोटभरसर्वांना दहादा

कसल्याअसल्या प्रथा
वायफळबाष्कळ धंदा
आकुंचित हो संस्कृती
रे कायद्याचा चेंदामेंदा

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

हिजाब...

शाळेमध्ये
महत्वाचे
लेखणी न् किताब
कुठून आला पडदा
हवाय नको हिजाब

जळजळीत भाषणे
ओतती वक्ते तेजाब
ऐकता पिटा टाळ्या
वाहवा रे लाजवाब

हड्डीतोड ती वक्तव्ये
खाई कंटक कबाब
बोल बेधुंद अंधाधुंद
कसा त्याचा रूबाब

बहकलेले शब्दकसे
विना ढोसता शराब
ऐकून घेतो शांततेने
बरळ त्यांची खराब

लोकांची करमणूक
खुशीत नाचतो मॉब
दंगल ग्रस्त हो देश
एवढाचं यांचा जॉब

वार दुस-या धर्मावर
नाही राखला आब
घाव घालून वर्मावर
आपला वाढवे दाब

अंकुशदंगलखोरांवर
द्यारे सडेतोड जबाब
एवढे तरी करू शके
निदान विचारा जाब

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

माझी मैना गावावर राहिली- लावणीकार

(१८ जुलै: अण्णा भाऊ साठे पुण्यतिथी)



उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले, दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहात आले. महामानव डॉ. बाबासाहेबांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव। सांगूनि गेले मज भीमराव? हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यांत माझी मैना गावावर राहिली आणि मुंबईची लावणी या अजोड आणि अविस्मरणीय आहेत. अधिक माहितीसाठी वाचा श्री एन. कृष्णकुमार यांचा हा ओजस्वी लेख... संपादक.

अण्णाभाऊ ऊर्फ तुकाराम भाऊराव साठे यांची निरीक्षणशक्ती अत्यंत सूक्ष्म होती. त्यांच्या लेखन शैलीला मराठमोळा, रांगडा पण लोभस घाट आहे. नाट्यमयता हाही त्यांच्या लेखनशैलीचा एक खास गुण होता. ज्या विपर्यस्त जीवनातून अण्णाभाऊंनी अनुभव आत्मसात केले, त्यांतील क्षणांचा वेग आणि आवेग त्यांच्या लेखनात जाणवतो. लवचिक भावचित्रे अंगासरशा मोडीने साकार करण्याची त्यांची लकबही स्वतंत्र आहे. लेखनावर त्यांनी जीव जडवला होता; त्यांनी ते विपुल केले. रशियाच्या इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटीच्या निमंत्रणावरून ते सन १९६१ साली रशियाला गेले. तेथील अनुभवांवर आधारित माझा रशियाचा प्रवास हे प्रवास वर्णन त्यांनी लिहिले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, गीते, लोकनाट्ये आदींचा समावेश होता. महाराष्ट्राची परंपरा या नावाने त्यांनी या चळवळीसाठी पोवाडा लिहिला; त्याचप्रमाणे मुंबई कुणाची? या लोकनाट्याचे महाराष्ट्रभर प्रयोग केले. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, शेटजींचे इलेक्शन, बेकायदेशीर, पुढारी मिळाला, लोकमंत्र्यांचा दौरा ही त्यांची अन्य काही लोकनाट्ये आहेत. अण्णाभाऊंनी पारंपरिक तमाशाला आधुनिक लोकनाट्याचे रूप दिले.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

अण्णाभाऊ साठे हे कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवासवर्णन अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतील लेखन केलेले ख्यातनाम मराठी साहित्यिक होत. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी गुन्हेगार म्हणून शिक्का मारलेल्या एका जमातीत त्यांचा जन्म दि. १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव सिधोजी साठे तर आईचे नाव वालबाई होते. त्यांचे मूळ नाव तुकाराम होते. त्यांचे जन्मस्थळ वाटेगाव, ता. वाळवा, जि. सांगली होय. त्यांचे शालेय शिक्षण झालेले नव्हते; तथापि त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षरज्ञान मिळविले. सन १९३२साली वडिलांसोबत ते मुंबईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचणे, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी, अशी मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले व अनुभवलेही. त्यांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. सन १९३६मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले. मुंबईत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत अनेक नेत्यांची भाषणे त्यांनी ऐकली. पक्षाचे कामही ते करीत होतेच; तथापि वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलतभावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. पुढे सन १९४२च्या चळवळीत सहभागी झाल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर पकड वॉरंट काढले. पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले. मुंबईत लोकशाहीर म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोक शाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला स्तालिनग्राडचा पवाडा सन १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यांनी सन १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा कलापथक स्थापन केले. या कलापथकावर सरकारने बंदी घातली. अमळनेरचे अमर हुतात्मे आणि पंजाब-दिल्लीचा दंगा या त्यांच्या काव्यरचना सन १९४७ साली प्रसिद्ध झाल्या. पंजाब-दिल्लीचा दंगा या रचनेत सर्व प्रागतिक शक्तींना एकत्र येऊन शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

अण्णाभाऊंच्या साहित्यात त्यांची कथा-कादंबरीची निर्मितीही ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतूस, आबी, खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरानगरची भुतं, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह; त्यांनी पस्तीस कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा ही त्यांची पहिली कादंबरी. त्यानंतर ३४ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांत फकिरा, वारणेचा वाघ, चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ, वैजयंता यांसारख्या कादंबऱ्यांचा समावेश होतो. त्यांच्या फकिरा या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. वास्तव, आदर्श आणि स्वप्नरंजन यांचे मिश्रण त्या कादंबरीत आहे. सत्प्रवृत्तीचा, माणुसकीचा विजय हे अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांचे मुख्यसूत्र होय. त्यांच्या या कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले- वैजयंता, टिळा लावते मी रक्ताचा, डोंगरची मैना, मुरली मल्हारीरायाची, वारणेचा वाघ, अशी ही साताऱ्याची तऱ्हा, फकिरा या शिवाय इनामदार, पेंग्याचं लगीन, सुलतान ही नाटकेही त्यांनी लिहिली. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले, दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहात आले. महामानव डॉ. बाबासाहेबांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव। सांगूनि गेले मज भीमराव? हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यांत माझी मैना गावावर राहिली आणि मुंबईची लावणी या अजोड आणि अविस्मरणीय आहेत. अतिशय तळमळीने लिहिण्याची त्यांची वृत्ती होती. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे, असे ते म्हणत. हाच त्यांच्या लेखनाचा प्रेरणा स्रोत होता. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून त्यांनी उभ्या केलेल्या माणसांत जबरदस्त जीवनेच्छा दिसते. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन दलित लेखकांची एक प्रतिभावान पिढी निर्माण झाली. त्यात बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम, शरणकुमार लिंबाळे आदींचा अंतर्भाव होतो. पुढे पुढे मात्र दारिद्र्य आणि एकाकी आयुष्य त्यांच्या वाट्याला प्रकर्षाने आले. मराठी साहित्यातील प्रतिष्ठितांकडून त्यांची उपेक्षा झाली. विपन्नावस्थेत गोरेगाव- मुंबई येथे त्यांचे दि. १८ जुलै १९६९ रोजी निर्वाण झाले. मरणोपरांत महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध सिद्ध केले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांची केवळ भारतीयच नव्हे, तर २२ परकीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

!! स्मृतिदिनी त्यांना व त्यांच्या शब्दसाधनेला मानाचा लवून मुजरा !!

'पी. एम .श्री. कै. भ . कों. खरात नगरपालिका शाळा क्रमांक १० सिद्धनाथवाडी वाईची पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा यशाची परंपरा कायम'

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : राज्य गुणवत्ता यादीमध्ये एक व सहा विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा सन २०२४ २५ चा निकाल नुकताच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला यामध्ये पुन्हा एकदा यशाची उज्वल परंपरा अबाधित राखत प्रशालेच्या सहा विद्यार्थ्यांनी राज्य व जिल्हा यादीत आपल्या यशाचा झेंडा रोवलेला आहे व दैदिप्यमान असे यश मिळवलेले आहे पी एम श्रीकै. भ. को. खरात न पा शाळा क्रमांक १० चे सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत यापैकी वेदांत गणेश यादव हा राज्याच्या यादीत बारावा तर जिल्हा यादीत आठवा आलेला असून अधिराज मयूर निंबाळकर हा जिल्हा यादीत ७३ वा तसेच स्वरा कुमार जाधव जिल्ह्यात९२ वी तसेच अनुज जगन्नाथ सरगर जिल्ह्यात१२१वा, तेजस राहुल जायगुडे जिल्ह्यात १६४ वा, राजवीर गणेश शिंदे१९१ वा हे विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले असून त्यांनी यशाची परंपरा पुढे नेलेली आहे. त्याचप्रमाणे २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या सैनिक स्कूल परीक्षेमध्ये प्रशालेचे पाच विद्यार्थी चमकले असून दोन विद्यार्थी नवोदय परीक्षेमध्ये यशस्वी झालेले आहेत. आजपर्यंत ११५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झालेले आहेत .शाळेमध्ये घेतल्या जाणाऱ्या सर्वच शासकीय स्पर्धा परीक्षेमध्ये प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादित केलेले आहे. त्यामध्ये मंथन, अभिरूप ,एन एम एम एस तसेच शिष्यवृत्ती या सर्व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी यश संपादित केलेले आहे. श्री कै भ कों खरात नगरपालिका शाळा क्रमांक १० चे माजी वरिष्ठ मुख्याध्यापक श्री महादेव सोपान अडगळे व प्रभारी मुख्याध्यापक सौ शारदा रविन्द्र परामणे

यांच्या नियोजनबद्ध कार्यातून हे घवघवीत यश संपादन करणे शक्य झालेले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका श्रीमती प्रीती भिवा ससाने व श्रीमती अश्विनी बबन सूर्यवंशी तसेच शाळेतील इतर सर्व शिक्षक वृंद यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे .

या यशाबद्दल वाई नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सौ संजीवनी दळवी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विजयकुमार परीट, तहसीलदार सोनाली

मेटकरी, कार्यालय अधीक्षक नारायण गोसावी ,वाई नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी श्री साईनाथ वाळेकर वाई पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी हर्षवर्धन मोरे तसेच सिद्धनाथवाडीचे माजी नगराध्यक्ष श्री राजाभाऊ खरात तसेच माजी नगराध्यक्षा सौ नीलिमाताई खरात ,माजी नगराध्यक्ष दत्तात्रय खरात, माजी नगराध्यक्ष शंकरराव खरात (पाटील) ,तसेच माजी नगरसेविका सौ. रेश्मा ताई जायगुडे नगरसेवक सौ प्रियांका ताई डोंगरे, माजी नगरसेवक श्री राजेश गुरव माजी नगरसेवक श्री प्रदीप जायगुडे तसेच माजी नगरसेवक कांताराम जाधव तसेच सिद्धनाथ वाडीतील ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ .प्रियांका अमोल मोहिते उपाध्यक्ष सौ .मिनाकुमारी रंजन कुमार वायदंडे तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जि .प .प्रा .शाळा रांजणगाव गणपती शाळेस शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ बाळासाहेब कुंभार

रांजणगाव गणपतीः जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणगाव गणपती येथील शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत एकूण ५ विद्यार्थी व मंथन परीक्षेत १ विद्यार्थी जिल्ह्यात दुसरा क्रमांक आलेला आहे . गुणवत्ता यादीत व मंथन परीक्षेत आलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे संयोग मोरे - २६२ गुण , आयुष शेटके - २५६ गुण , दिव्यांक खेडकर - २४८ गुण , आचल कदम २४८ गुण , श्रद्धा काळे - २४४ गुण, कृष्णा सलापुरे - २४२ गुण वरील विद्यार्थ्यांना उत्कर्षा संजयकुमार वाळके , हौसाबाई रामदास चोरे , पुष्पलता सुरेश थोरात या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

वरील विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचा सत्कार फेटा, शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ व विद्यार्थ्यांना श्यामची आई हे पुस्तक देऊन करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहूल वाघुले, सदस्य वर्षा खेडकर, रोहिदास खेडकर, गणेश शिंदे, पालक, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते . राहूल वाघुले व मुख्याध्यापक सुरेश थोरात यांचे हस्ते सर्वांचा सन्मान करण्यात आला .

यावेळी विद्यार्थी, पालक, मार्गदर्शक शिक्षक उत्कर्षा वाळके , पुष्पलता थोरात , पंडित वेताळ , वर्षा खेडकर व सुरेश थोरात यांनी आपले मनोगत व्यक्त केले . शिक्षक चव्हाण सर यांनी विद्यार्थी व पालकांना फेटे बांधले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिदास खेडकर यांनी केले तर आभार संजयकुमार वाळके यांनी मानले.

मालोजीराजे विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

लोणंद ■ मंगेश माने



लोणंदः : येथील मालोजीराजे विद्यालय व जुनिअर कॉलेज, लोणंद येथे गुरुवार (दि. १७ जुलै २०२५) रोजी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. गुरू व शिष्याच्या अतूट श्रद्धेचा उत्सव म्हणजे गुरुपौर्णिमा! गुरू चारित्र्याचा शिल्पकार असतो. तो शिष्याला अंधःकाराकडून प्रकाशाकडे, अज्ञानाकडून ज्ञानाकडे घेऊन जातो. तो नरामधला नारायण वाढवतो. गुरू ईश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे, कारण तो ईश्वराची ओळख करून देतो. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तीर्थरूप कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यालयाचे उपप्राचार्य आबाजी धायगुडे यांनी प्रस्ताविकेतून गुरुपौर्णिमा दिवसाचे महत्त्व व इतिहासाची माहिती दिली तसेच आई-वडील आणि गुरुजनांचा आदर करा, गुरु शिष्य परंपरा स्मरण ठेवा असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य चंद्रकांत जाधव यांनी आई वडिलांचे आपल्या आयुष्यातील स्थान याबाबत मार्गदर्शन केले. तसेच ते म्हणाले की वेदांनुसार देवाचे तीन प्रत्यक्ष रूपे आई, पिता आणि गुरु आहेत (मातृदेवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव) नंतर सर्व मुलांनी शिक्षकांना गुलाब पुष्प व पेन देऊन गुरुवंदन केले.

इयत्ता १२ वी (विज्ञान) चा विद्यार्थी जयेश सकलावे व विद्यार्थिनी उमा क्षीरसागर यांनी भाषण देऊन गुरु विषयी आदर व्यक्त केला. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. राजेंद्र शेळके यांनीही गुरु विषयीची महती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. तसेच विद्यालयाचे क्रीडा शिक्षक महेश जाधव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी इयत्ता १२ वीचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक प्रतिनिधी अनुष्का पवार हिने आभार मानले. विद्यार्थी प्रतिनिधी खुष्णोदी बागवान हिने सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. गिरीश दाभाडे प्रा. लक्ष्मीकांत कडू पाटील यांनी विशेष प्रयत्न केले

हर्षवर्धन सावंत ,वैष्णवी पांढरपट्टे ठरले बालवैज्ञानिक स्पर्धेचे मानकरी

सातारा ■ प्रतिनिधी



श्री मळाई देवी शिक्षण संस्था संचलित आ.च.विद्यालय मलकापूर येथील हर्षवर्धन राम सावंत इ.६वी तसेच इ.९वीतील वैष्णवी राजेंद्र पांढरपट्टे हे विद्यार्थी डॉक्टर होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाले. विद्यालयाच्या स्पर्धा परीक्षेच्या उज्वल इतिहासामध्ये भर घालून नावलौकिक वाढविल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

श्री मळाई देवी शिक्षण संस्थेचे सचिव मा.अशोकराव थोरात यांनी विद्यार्थ्यांचे श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन कौतुक करून पुढे म्हणाले विद्यालयीन शिक्षण घेत असताना विविध स्पर्धांमध्ये भाग घेतल्यास विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असल्याचे सांगितले.विद्यार्थ्यांनी शालेय स्तरावर होणाऱ्या विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेऊन स्वतःचे मनोबल वाढवावे व २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज व्हावे,असे आवाहन केले.

यावेळी आपल्या यशाचे गमक सांगताना वैष्णवी पांढरपट्टे म्हणाली प्रयत्न जिद्द चिकाटीच्या जोरावर यश मिळवता येते. यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्नवादी व्हायला पाहिजे असे आवाहन सर्व विद्यार्थ्यांना केले.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.ए.कुंभार, उपमुख्याध्यापक श्री.ए.बी.थोरात, पर्यवेक्षक श्री.बी.जी.बुरुंगले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी,पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे गुलाब पुष्प देऊन कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शरद तांबवेकर यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार पर्यवेक्षक श्री भरत बुरुंगले यांनी मानले.हर्षवर्धन सावंत ,वैष्णवी पांढरपट्टे ठरले बालवैज्ञानिक स्पर्धेचे मानकरी.श्री मळाई देवी शिक्षण संस्था संचलित आ.च.विद्यालय मलकापूर येथील हर्षवर्धन राम सावंत इ.६वी तसेच इ.९वीतील वैष्णवी राजेंद्र पांढरपट्टे हे विद्यार्थी डॉक्टर होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाले. विद्यालयाच्या स्पर्धा परीक्षेच्या उज्वल इतिहासामध्ये भर घालून नावलौकिक वाढविल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

श्री मळाई देवी शिक्षण संस्थेचे सचिव मा.अशोकराव थोरात यांनी विद्यार्थ्यांचे श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन कौतुक करून पुढे म्हणाले विद्यालयीन शिक्षण घेत असताना विविध स्पर्धांमध्ये भाग घेतल्यास विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असल्याचे सांगितले.विद्यार्थ्यांनी शालेय स्तरावर होणाऱ्या विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेऊन स्वतःचे मनोबल वाढवावे व २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज व्हावे,असे आवाहन केले.

यावेळी आपल्या यशाचे गमक सांगताना वैष्णवी पांढरपट्टे म्हणाली प्रयत्न जिद्द चिकाटीच्या जोरावर यश मिळवता येते. यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्नवादी व्हायला पाहिजे असे आवाहन सर्व विद्यार्थ्यांना केले.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.ए.कुंभार, उपमुख्याध्यापक श्री.ए.बी.थोरात, पर्यवेक्षक श्री.बी.जी.बुरुंगले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी,पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे गुलाब पुष्प देऊन कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शरद तांबवेकर यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार पर्यवेक्षक श्री भरत बुरुंगले यांनी मानले.

महात्मा गांधी इंग्लिश मीडियम मंचर येथे वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न

आंबेगाव ■ प्रतिनिधी



आंबेगाव : मंचर शहरातील महात्मा गांधी प्रायमरी इंग्लिश स्कूल मंचर या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न झाला..

रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा.श्री उदयजी पाटील यांच्या संकल्पनेतून ७० पेक्षा जास्त प्रकारची विविध झाडे लावण्यात आली आहे.ही सर्व वृक्ष पर्यावरण करिता तसेच विद्यार्थ्यांच्या शारीरिक,बौद्धिक व मानसिक आरोग्या करिता लाभदायक आहेत याचा सखोल अभ्यास उदयजी पाटील यांनी करून हे सर्व भारतीय वृक्ष निवडलेली आहे.ही सर्व वृक्ष ऑक्सिजन व ओझेन देणारी व पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन राखणारी आहे.या संकल्पनेतून खऱ्या अर्थाने उदयजी पाटील यांची दूरदृष्टी, नेतृत्व,समाजातील बांधिलकी व शिक्षण क्षेत्रामध्ये काम करण्याची प्रामाणिक तळमळ दिसून येते.

तसेच मा.आमदार स्वर्गीय शिवाजी दादा बेंडे पाटील यांचे विचार व शिकवण खऱ्या अर्थाने उदयजी पाटील यांच्यामध्ये दिसून येत आहे.त्यांच्या कुटुंबातील तीन पिढ्यांचे योगदान समाजापुढे आदर्श घेण्यासारखे व मोलाचे आहे.त्यांच्या या उपक्रमाची व संकल्पनेची समाजातून मोठ्या प्रमाणात स्तुती होत आहे.सध्याच्या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड ही काळाची गरज बनली असून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आणि भावी पिढ्यांना निसर्गाचा वारसा मिळावा या हेतूने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड होणे अत्यावश्यक आहे.या उपक्रमाचा मुख्य उद्देश 'सुंदर शाळा,हरित शाळा' या संकल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करत लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य उदयजी पाटील,भाजप नेते जनसेवक श्री संजय थोरात,राजाराम बाणखेले,बाळासाहेब बाणखेले,दत्ता गांजाळे,संतोष बाणखेले,वसंतराव बाणखेले, अण्णासाहेब आवटे कॉलेजचे प्राचार्य नानासाहेब गायकवाड,लक्ष्मण थोरात,आशिष पुगलीया,बयाजी तात्या थोरात,परशुराम भेके,कालिदास गांजाळे,नवनाथ थोरात,विकास जाधव,सालीम इनामदार,विनायक भालेराव तसेच प्राचार्य बांगर मॅडम उपस्थित होते. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक,सेवक,विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

ज्येष्ठ नागरिकांना सुविधा : खासगी विधेयक एकमताने मंजूर; आ.डॉ.राहूल पाटील यांच्या प्रयत्नांना भरीव यश

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : राज्यभरातील ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक अशा महत्वपूर्ण सुविधा मिळाव्यात यासाठी आमदार डॉ.राहुल पाटील हे मागील अनेक कालावधीपासून प्रयत्नशील होते. त्या अनुषंगानेच त्यांनी नुकताच विधानसभेत सादर केलेल्या 'ज्येष्ठ नागरिक सेवा सुविधा या खासगी विधेयकास' सभागृहाने एकमताने मंजूरी दिली आहे. तद्वतच आ.पाटील यांनी केलेल्या अथक प्रयत्नांना भरीव असे यश मिळाले आहे.

सदर विधेयकात निराधार आणि उपेक्षित अशा ज्येष्ठ नागरिकांना दरमहा सात हजार रुपये मानधन देणे, पाच लाख रुपयांपर्यंत आरोग्य विमा संरक्षण मिळणे, नियमित आरोग्य तपासणीसह मोफत उपचार मिळणे, महाराष्ट्र दर्शनासाठी रुपये १५ हजारांचा विशेष भत्ता देणे, त्याबाबतच्या तक्रारींसाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देणे, अशा विविध तरतुदी आहेत. त्याशिवाय पाल्यांकडून देखभाल न केली जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी जिल्हास्तरावर निवास व भोजन व्यवस्था करण्याचीही मागणी या विधेयकातून करण्यात आली आहे. त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याविषयीचीही सूचना या विधेयकांत समाविष्ट केली आहे. सदर विधेयकास एकमताने मंजूरी मिळाल्याने आता लवकरच ते विधेयक विधानसभेच्या पटलावर सादर होणार असून, त्यावर सखोल अशी चर्चा होऊन अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही काही महत्त्वाचे पाऊल उचलत, आमदार डॉ.पाटील यांनी विधानसभेत आणखी एक विधेयक सादर केले आहे. त्यामध्ये प्रत्येक जिल्हा रुग्णालयात मेमोग्राफी मशीन उपलब्ध करून देणे, जिल्हास्तरावर स्वतंत्र कर्करोग उपचार रुग्णालय स्थापन करणे, तसेच महिलांसाठी कर्करोग प्रतिबंधात्मक लस मोफत उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यातून करण्यात आली आहे. एकूणच काय तर हे विधेयक लवकरच पारित होणार असल्याने संपूर्ण राज्यभरातील लाखोंच्या संख्येतील ज्येष्ठ नागरिकांना या सेवेचा लाभ मिळू शकणार आहे.

गणराया वार्ड २०२४: हलवाई चौक, डंबेनाला आणि कापड बाजार मंडळांचा अभिमानास्पद सन्मान

शिरुर (पुणे) ■ अविनाश घोगरे

पोलीस विभागाच्या वतीने सामाजिक, पर्यावरणपूरक आणि विधायक उपक्रमांची दखल; हलवाई चौक मंडळास प्रथम क्रमांकाचा बहुमान



शिरूर शहर (पुणे) : शिरूर, गणेशोत्सव २०२४ मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मंडळांच्या मूल्यांकनानंतर 'गणराया ?वार्ड - २०२४' या स्पर्धेचा प्रथम क्रमांक हा हलवाई चौक गणेश मित्र मंडळ, हलवाई चौक शिरूर यांना घोषित करण्यात आला आहे. या गौरवाच्या बक्षिसाचे वितरण पोलिस उपअधीक्षक प्रशांत ढोलेआणि पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या हस्ते करण्यात आले.

हा भव्य कार्यक्रम शिरूर येथील पंचायत समितीच्या सभागृहात पार पडला. या वेळी मंडळाच्या कार्याची प्रंशसा करत पोलीस व पाहुण्यांनी विविध विधायक उपक्रमांविषयी माहिती दिली.

'शिरूरमधील गणेश मंडळांनी पर्यावरणपूरक देखावे, सकारात्मक संदेश देणारे उपक्रम राबवले. मंडळांनी पारंपरिक वाद्यांचा वापर करून संस्कृती जपली आहे. शिरूरमधील नागरिकांचे पोलीस प्रशासनास भरघोस सहकार्य लाभते, हे विशेष समाधानकारक आहे.'

पोलीस उप अधीक्षक प्रशांत ढोले

'शहरामध्ये यंदापासून डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा व्हावा. पारंपरिक वाद्यांमधूनच उत्सवाचा आनंद द्विगुणित करता येतो.'

शिरूर पोलिस निरीक्षक-संदेश केंजळेद्वितीय क्रमांकः डंबेनाला गणेश मित्र मंडळ, यशवंतराव चव्हाण चौक, तृतीय क्रमांकः कापड बाजार गणेश मित्र मंडळ उत्तेजनार्थ, छत्रपती संभाजी गणेश मित्र मंडळ, सुवर्णयुगचा राजा मित्र मंडळ (हुडको कॉलनी) , हनुमान गणेश मित्र मंडळ (मारुती आळी), अजिंक्यतारा गणेश मित्र मंडळ (मुंबई बाजार)

प्रा. चंद्रकांत थापटे, प्रा. विलास आंबेकर, रविंद्र बापू सानप, डॉ. रविन बोरा, ?ड. सुप्रिया साकोरे आणि प्रा. सतिश धुमाळ यांनी मंडळांच्या उपक्रमांचे निरीक्षण व परीक्षण केले.

हलवाई चौक गणेश मित्र मंडळाचे उल्लेखनीय कार्य विसर्जन मिरवणूक साध्या पद्धतीने काढून वाचवलेल्या निधीतून परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले.उत्सव मंडप खड्डेविरहित, महिला आरतीची शहरात सुरुवात करणारे पहिले मंडळ आरतीच्या वेळी महिलांना तुलसी व देशी झाडांची रोपे भेट. विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश, पोलीस व स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा, आरोग्य शिबिरे, प्रबोधन कार्यक्रम महाप्रसादाचे आयोजन, वृक्षारोपण मोहीम, गणेशजयंती निमित्त महाप्रसाद 'प्रेरणादायी शिक्षक पुरस्कार'– २५ हून अधिक शिक्षकांचा सन्मान कोरोना काळात व पूरग्रस्त भागात मदतकार्य,स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग, चांदीची अलंकारमालिका, विविध धर्मीयांचा सहभाग मंडळाचा सुवर्ण महोत्सव (५० वर्षे) या वर्षी हलवाई चौक गणेश मित्र मंडळाचा ५० वा उत्सव वर्ष असून, प्रथम क्रमांकाच्या बक्षिसाने मंडळाच्या कार्याचा शिरपेच अधिक उंचावला आहे. बक्षीस जाहीर होताच कार्यकर्त्यांनी पेढे आणि लाडू वाटून आनंदोत्सव साजरा केला.

या वेळी प्रमुख उपस्थिती संजय बारवकर (जिल्हाध्यक्ष, जनता दल), नितीन बारवकर (जेष्ठ पत्रकार), अरुणकुमार मोटे, सागर रोकडे, पोपटराव पाचंगे, रवी खुडे, फैझल पठाण, विजय पवार, अनिल डांगे, मुकुंद ढोबळे, झांबरे ताई, फिरोज शिकलकर, उषा वाखरे (वात्सल्य सिंधू फाउंडेशन), महेबूब सय्यद (जिल्हा उपाध्यक्ष, मनसे), अविनाश घोगरे (तालुका संघटक, मनसे), रवी लेंडे (शहर सचिव, मनसे), सविता बोरुडे(आधार छाया फाउंडेशन), डॉ. वैशाली साखरे, कामिनी बाफना (?क्टिव्ह सोशल ग्रुप), नितीन थोरात, शोभना पाचंगे, बाळासाहेब झोडगे, अशोक काळे, प्रसाद लांडे, आशिष दुगड, मितेश गादिया, सचिन मृत्याल, अजिंक्य तारू, अमोल गारुडी, सिंकदर मण्यार, रणजित गायकवाड, अविनाश जाधव, श्याम परदेशी, गौरव कालेवार, सचिन गरूडे, सनी जाधव आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आम्ही शिरूरकर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र बापू सानप यांनी केले , सूत्रसंचालन प्रा. सतिश धुमाळ? यांनी केले तर आभारप्रदर्शन ड्डपोलीस उपनिरीक्षक सागर शेळके यांनी केले.

पाचवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी प्रज्वल आंबोरे याचा शाळेत सत्कार



परभणी ■ अरविंद कांबळे

परभणी अरविंद कांबळे

पूर्णा : शिष्यवृत्ती अंतरिम निकालामध्ये प्रज्वल आंबोरे पाचवी गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षेत विद्या प्रसारिणी सभेची प्राथमिक शाळा, पूर्णा येथून प्रथम क्रमांकासह..तालुक्यातून शहरी विभागात प्रथम क्रमांक मिळवत शिष्यवृत्तीधारक झाल्याबद्दल शाळेत विद्या प्रसारिणी परिवारातफे आज दिनांक सत्कार करण्यात आला. संस्था अध्यक्ष श्री डॉक्टर व्ही डी वाघमारे साहेब, संस्था उपाध्यक्ष श्री भीमरावजी कदम साहेब, संस्था सचिव श्रीनिवासजी काबरा साहेब या सर्वांनी या यशाबद्दल प्रज्वल चे अभिनंदन केले. शिष्यवृत्तीधारक झाल्याबद्दल खूप खूप अभिनंदन व मनःपूर्वक

पनवेल-उरण पाणीटंचाईवर आमदार प्रशांत ठाकूर यांचा आक्रमक पवित्रा; ऑटोमायझेशनसाठी दोन महिन्यांत निविदा जाहीर करण्याचे मंत्री उदय सामंत यांचे आश्वासन

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे

आमदार प्रशांत ठाकूर यांची सिडकोच्या कारभावर तीव्र आणि आक्रमक भावना



उरण : पाणी पुरवठा व वितरणासंदर्भात उलवे येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन राजे येरुणकर यांनी व त्यांच्या शिष्ट मंडळने आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर, प्रितम म्हात्रे आणि सचिन घरत यांची भेट घेऊन सदर पाण्याची समस्या सोडविण्याची मागणी केली होती. या मागणीला व सचिनराजे येरुणकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला आता यश आल्याचे दिसून येत आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी लगेचच हा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला आहे. आणि शासनातर्फे त्याला सकारात्मक प्रतिसाद देखील मिळाला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत सिडकोच्या कारभावर तीव्र नाराजी आणि आक्रमकपणे भावना व्यक्त केल्यानंतर येत्या दोन महिन्यात पाणी वितरणासाठी ऑटोमायझेशनसाठी (स्वयंचलित यंत्रणा) निविदा जाहीर करण्याचे आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी दिले असून या निर्देशानुसार कार्यवाही न केल्यास सिडकोच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन सभागृहात दिले आहेत. सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईमधील पनवेल आणि उरण तालुक्यातील पाणीसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित केली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचना मांडताना नागिरकांच्या भावना आक्रमकपणे प्रकट केल्या तसेच सिडको अधिकाऱ्यांच्या कारभारावर संताप व्यक्त करत ताशेरे ओढले. त्यावर प्रशासनातर्फे योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. नामदार उदय सामंत यांनी उत्तर देताना, आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाण्याच्या संदर्भात तीव्र भावना आक्रमपणे मांडल्या आहेत त्याची दखल शासन घेणार असल्याचे सांगितले. काहीही करा मॅन्युअल प्रणाली बंद करून ऑटोमायझेशनकडे जात नाही तो पर्यंत यावर योग्य पर्याय निघणार नाही असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले आहे. सीसी, ओसी थांबवणे संयुक्तिक होणार नाही मात्र पाण्याची पातळी, पुरवठा, साठवण या संदर्भात बघितल्यानंतर ३१९ एमएलडी पाणीचे आपण पुरवठा करीत आहोत. २३ एमएलडीचा फरक आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. दोन वर्षांत काही प्रकल्प होणार आहेत मग ते होईपर्यंत पाण्यासाठी थांबायचे का हे त्यांचे म्हणणे सकारात्मक आणि बरोबर आहे. जोपर्यंत पाणी वितरणाचे ऑटोमायझेशन होत नाही तो पर्यंत त्याला पर्याय निघणार नाही, त्यामुळे दोन महिन्याच्या आत या संदर्भातील निविदा जाहीर करण्याचे निर्देश सिडकोला आजच दिले जातील, असे आश्वासन नामदार उदय सामंत यांनी देणार असल्याचे आश्वासित केले. त्याचबरोबरीने यामध्ये अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले तर त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलणार असल्याचेही त्यांनी यावेळी आपल्या निर्देशात स्पष्ट केले.

विकासकामे असो किंवा नागरिकांना भेडसावणारे प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासन दरबारी मांडून नागरिकांना कायम न्याय मिळवून दिला आहे. वेळ पडल्यास त्यांनी लोकांसाठी आपल्या पदाचा विचार केला नाही. आज त्यांनी सभागृहात बोलताना सिडकोच्या कारभाराविषयी तीव्र संताप व्यक्त केला मात्र त्यासोबतच असाच प्रशासनाचा कारभार राहिला तर लोकप्रतिनिधींना राजिनामा दिल्याशिवाय पर्याय राहणार नाही अशी खंत व्यक्त केली. अभ्यासपूर्ण मांडणीत त्यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांचा निष्क्रिय कारभाराचे वाभाडे काढले. त्यामुळे एक कर्तव्यदक्ष आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांच्या वतीने मांडलेला आवाज सभागृह ठणकावून गेला. शासनाने त्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. येत्या दोन महिन्यांत ऑटोमायझेशन निविदा जाहीर होणार असल्याने पाण्याच्या प्रश्नाला वाचा फुटली असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात घेतलेल्या आक्रमक भूमिकेचा नागरिकांतून कौतुक होत आभार व्यक्त केले जात आहे. अशी प्रतिक्रिया उलवे येथील सामाजिक कार्यकर्ते सचिनराजे येरुणकर यांनी दिली आहे. सचिनराजे येरुणकर यांनी या बाबतीत आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर या दोन्ही आमदारांचे उरण व पनवेल तालुक्यातील पाण्याचा प्रश्न विधानसभेत मांडल्याने आभार मानले आहेत.

पुरोगामी विचारांच्या नेत्यांवर हल्ला करणाऱ्या माथेफिरूच्या प्रतिकृती जोडे मारून 'रिपाईतर्फे निषेध आंदोलन संपन्न !

सातारा ■ प्रतिनिधी

सातारा : शिव-फुले-शाहू- आंबेडकर यांच्या महाराष्ट्रामध्ये पुरोगामी विचारांच्या नेत्यांवरती हल्ले करणारा प्रकार वाढतच आहे.आता संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रविंदादा गायकवाड यांच्यावर भ्याड हल्ल्याचा निषेध करून प्रतिमेस जोडे मारण्यात आले.

राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाईतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात आले. कलबुर्गी,दाभोळकर,पानसरे इत्यादी नंतर अनेकांवरती छोटे-मोठे हल्ले होत आहेत. त्याच पद्धतीने सोलापूरमध्ये एका कार्यक्रमास असताना संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष गायकवाड यांच्यावरती काही माथेफिरूनी जो भ्याड हल्ला केला होता. त्या हल्ल्याचा रिपब्लिकन पक्षाच्यावतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या हल्ल्याच्या निषेधार्थ संबंधित माथेफिरूच्या प्रतिकृतीला जोडे मारो आंदोलनही करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांनी दिली. संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून गायकवाड यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वातंत्र्याचे विचार, महात्मा फुले यांचे समतेचे विचार, बाबासाहेब आंबेडकरांचे न्यायाचे विचार व शाहू महाराजांचे बंधुत्वाचे विचार हे संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून बहुजन समाजातील सर्व जाती-धर्मापर्यंत पोहोचवलेल आहेत.अशा हुकूमशाही, झुंडशाही व भांडवलशाहीच्या विरोधात लढणारी फौज संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून होत असल्यामुळे काही समाज विघातक लोकांकडून असे प्रकार होत आहेत.तेव्हा सरकारने पाठीशी घालू नये. तसेच असे अनैतिक कृत्य करणाऱ्यांमुळे पुरोगामी चळवळ संपुष्टात येऊशकते.पुरोगामी चळवळ हीच महाराष्ट्राची खरी ओळख आहे. फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात अशा प्रकाराला थारा देण्याचे काम सरकारने करू नये.तेव्हा संबंधितावरती शासनाने कारवाई करावी.या मागणीसाठी आंदोलन छेडण्यात आले.यावेळी सोमनाथ धोत्रे,दीपक भोसले,रॅम मदाळे,जलीम शेख,विनोद ओव्हाळ,राकेश जधव,किरण ओव्हाळ,शाहरुख शेख,विजय ओव्हाळ,दामिनी निंबाळकर, मनीषा सोनावणे,सतीश ओव्हाळ,शेखर अडागळे,शीतल बल्लाळ,अंकुश निंबाळकर, राजू ओव्हाळ,सोमनाथ आवळे, विजय,अजित नलवडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थीत होते.

हृदयविकारग्रस्त रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेत पुनः समाविष्ट करावे – माजी आमदार व जिल्हाध्यक्ष चरण वाघमारे यांची शासनाकडे ठाम मागणी

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा, राज्यातील तसेच भंडारा जिल्ह्यातील शेकडो हृदयविकारग्रस्त रुग्ण संजय गांधी निराधार योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असून त्यांना न्याय मिळावा यासाठी माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष चरण वाघमारे यांनी शासनाकडे ठाम मागणी केली आहे.

पूर्वी या योजनेत अंतर्भूत असलेल्या हृदयविकारग्रस्त लाभार्थ्यांची पेन्शन अचानक थांबविण्यात आली असून, नव्याने निदान झालेल्या रुग्णांनाही योजनेत समाविष्ट करण्यात येत नाही. हृदयविकार हा आजीवन औषधोपचार व खर्च असलेला गंभीर आजार आहे. ऑपरेशन झालेल्या रुग्णांना जड काम करता येत नाही, त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या उपजीविकेवर परिणाम होतो.

'हृदयविकारामुळे अनेकांना एकप्रकारचे अंशतः अपंगत्व येते, मात्र योजनेत त्यांचा विचारच केला जात नाही हे दुःखद आहे,' असे वाघमारे यांनी स्पष्ट केले.

त्यामुळे डी बी डी पोर्टलवर 'हृदयविकार' (पीएमजी) हा आजार स्वतंत्ररित्या नमूद करून पात्र लाभार्थ्यांना नोंदणीची संधी देण्यात यावी, तसेच जुन्या रुग्णांची पेन्शन तातडीने पुन्हा सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

'शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात येईल,' असेही त्यांनी यावेळी ठामपणे सांगितले.

जुन्नर तालुक्यातील आदिवासी संलग्नता अंतर्गत सांगनोरे या ठिकाणी यशदा शिक्षण संस्थेतील अधिकारी दाखल

जुन्नर ■ सचिन थोरवे



जुन्नर : दिनांक ९ जुलै ते १५ जुलै दरम्यान यशदा प्रशिक्षण संस्थेतील सहा वर्ग एक अधिकारी सांगणोरे तालुका जुन्नर येथे आदिवासी संलग्नता साठी दाखल राज्यातील वर्ग एक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे येथील सहा वर्ग एक चे अधिकारी अनिवार्य संलग्नता या उपक्रमा अंतर्गत सांगणोरे तालुका जुन्नर येथे दाखल झाले आहेत यामध्ये श्रीमती शितल घोलप (उपजिल्हाधिकारी), श्री सागर वाघमारे (तहसीलदार) , श्री अनिल काळे (सहाय्यक राज्यकर आयुक्त) , श्री प्रेरक उजगरे (शिक्षणाधिकारी) ,श्री गौरव बंग (सहाय्यक राज्यकर आयुक्त) व श्रीमती रूपा मोहितकर (बाल विकास प्रकल्प अधिकारी) हे सात दिवसांच्या अनिवार्य संलग्नतेसाठी सांगणोरे येथे दाखल झाले आहेत.

त्यांचे सर्वप्रथम ग्रामपंचायत येथे स्वागत करण्यात आले त्यानंतर गावातील अंगणवाडी, प्राथमिक शाळा, बचत गट, तलाठी कार्यालय, रेशन दुकान, कृषी सहायक कार्यालय आणि ग्रामीण आरोग्य उपकेंद्र येथे भेट देऊन विविध ग्रामीण यंत्रणांच्या कामकाजाची त्यांनी माहिती घेतली.

त्यासोबत गावातील कोल्हेवाडी -१ सांगणोरे,आणि कोल्हेवाडी -२ विद्यालय येथे भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि शिष्यवृत्ती परीक्षा संदर्भात त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. याच सोबत त्यांनी गावातील नागरिक आणि युवकांसमवेत अधिकाऱ्यांचा संवाद कार्यक्रमही आयोजित केला होता.

भारतीय स्टेट बँकेचे ए टी एम मशीन चार महिण्यापासून बंद

अनेक तक्रारी देऊनही वरिष्ठांचे दुर्लक्ष ग्राहकांना व विध्यार्थ्यांना होतो नाहक त्रास

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



विरुळ आकाजी : विरुळ येथील भारतीय स्टेट बँकेचे एटी एम मशीन मागील चार महिण्यापासून बंद अवस्थेत आहे वरिष्ठांनी एक जुने एटीएम मशीन मागील चार महिन्या अगोदर पाठविले होते ते कसेतरी काही दिवस चालले नंतर ते बंद पडले तेव्हापासून ते बंदच आहे याचा फटका ग्राहकांना व विध्यार्थ्यांना व लाडकी बहिणींना मोठा त्रास होत आहे वारंवार सांगूनही बँकेचे दुर्लक्ष दिसून येत आहे बँकेत कर्मचारी सुद्धा कमी असल्याने खात्यातील बॅलन्स पाहण्यासाठी ग्राहकांना ताटकळत उभे राहावे लागते याबाबत वरिष्ठांनी ए टी एम मशीन कडे लक्ष देऊन सुरू करण्याची मागणी ग्राहकांनी व विध्यार्थ्यांनी, लाडक्या बहिणीनी केली आहे

अवैध वाळू उत्खननावर कठोर कारवाईचा महसूलमंत्र्यांचा इशारा

मुंबई ■ दिलीप येवले

महसूल आणि पोलिसांची संयुक्त कारवाई होणार दंडासह फौजदारी गुन्हा दाखल होणार

मुंबई : 'अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर आता महसूल आणि पोलीस विभाग संयुक्तपणे कठोर कारवाई करणार आहे. यापुढे केवळ दंड आकारून वाहने सोडली जाणार नाहीत, तर फौजदारी गुन्हा दाखल होईल,' असे निवेदन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत सादर केले. अवैध वाळू उत्खनन, वापर आणि वाहतूक प्रकरणी महसूल आणि गृह विभागाने संयुक्त शासन निर्णय जारी केला असून, यामुळे वाळू माफियांना चाप बसणार आहे.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी निवेदन देताना स्पष्ट केले की, यापूर्वी अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने पकडल्यानंतर केवळ महसूल विभाग दंड आकारून त्यांना सोडून देत असे. मात्र, नव्या शासन निर्णयानुसार आता अशी वाहने पकडल्यास महसूल आणि पोलीस विभाग दोन्ही स्वतंत्रपणे कारवाई करतील. 'महसूल विभागाने वाहन पकडले तरी पोलिसांची कारवाई होईल आणि पोलिसांनी पकडले तरी महसूल विभाग कारवाई करेल. यामुळे दोन्ही विभागांचा दंड आकारला जाईल आणि फौजदारी गुन्हा दाखल होईल.'

या नव्या धोरणामुळे अवैध वाळू उत्खननाला आळा घालण्यासाठी अधिक कठोर पावले उचलली जाणार आहेत, असे सांगून बावनकुळे म्हणाले,' हा शासन निर्णय सर्वांना उपलब्ध करून दिला जाईल आणि याची अंमलबजावणी तात्काळ सुरू होईल. वाळू माफियांना आता कोणतीही सवलत मिळणार नाही. पारदर्शक आणि कठोर कारवाईद्वारे सामान्य जनतेला न्याय मिळेल आणि निसर्गाचे रक्षण होईल.'

या निवेदनामुळे वाळू माफियांवर कठोर कारवाईची टांगती तलवार असून, महसूलमंत्री बावनकुळे यांच्या नेतृत्वाखालील महसूल विभागाने गौण खनिजांचे नियमन अधिक प्रभावी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

रेल्वे पुला खाली पाणीसाचल्यामुळे शेतकरी व नागरिक बांधवांना करावी लागतो कसरत



वर्धा ■ प्रतिनिधी

पाणी साचल्याने शेतीचे साहित्य नेण्यात अडचण वर्धा जिल्हातील गोजी धोत्रा येते रेल्वे जाण्याकरिता पुलाचे बांधकाम ठेकेदारा मार्फत करण्यात आले आहे .पण गोजी व धोत्रा या गावातील गावाकऱ्यांना व शेतकरी बांधवाना याच मार्गाने शेतामध्ये जाने यने करावे लागत असल्यामुळे मात्र या पुलाखाली कंबरभर पाणी साचून राहते यामुळे या मार्गाने जाणे येणे खूप अवघड झाले आहे .पण रेल्वे टेशन गोजी धोत्रा नं . ८ नव्याने बांधलेल्या पुलाखाली पाणी साचून राहल्याने ट्राफिक जाम होण्याची शेकेता नाकारता येत नाही याची दखल घेत प्रशासनाने रेल्वे पुलाचे बांधकाम चालू केले पण पाणी निघण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला नाही तसेच पुलाचे अर्धवट केलेले काम पूर्ण करण्यात यावे असे धोत्रा येथील पोलीस पाटील विशाल आंबटकर व शेतकरी हे प्रशासणा कडे मागणी करीत आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेत लोकमान्य विद्यालयाचा संकल्प सत्पाळ जिल्ह्यात प्रथम

आष्टी (श) वर्धा ■ सुनिल मांडवे

इयत्ता आठवी मधून कौस्तुभ दीपक राणे जिल्ह्यात तिसरा



आष्टी (शहीद): लोकमान्य विद्यालय आष्टी येथील विद्यार्थ्यांनी यावर्षीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत दरवर्षीप्रमाणे घवघवीत यश मिळवले आहे.

इयत्ता पाचवीच्या परीक्षेच्या शहरी सर्वसाधारण गुणवत्ता यादीत जिल्ह्यामधून संकल्प दीपक सत्पाळ याने प्रथम क्रमांक पटकावला आहे तसेच जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्रता परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक सुद्धा संकल्प यानेच पटकावला आहे.

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात कौस्तुभ दीपक राणे यांने शहरी सर्वसाधारण गुणवत्ता यादीत जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

त्यांच्या या कामगिरी आणि यशामुळे शाळेचा सन्मान वाढला आहे याशिवाय आरोही कडू ,समृद्धी लाटकर यांनी सुद्धा मेरिट यादीत स्थान मिळवले आहे. या यशाचे श्रेय शाळेतील शिष्यवृत्ती वर्ग घेणारे गुणवत्तापूर्ण अध्यापक आणि शिक्षकांना तसेच पालकांच्या सहकार्याला दिले जात आहे.

विशेष म्हणजे मागील वर्षीच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत या विद्यालयाला जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त झालेला आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री. सुभाषजी गुप्ता, सचिव श्री. उमेशजी देशपांडे., मुख्याध्यापक श्री. विजय दाभाडे उपमुख्याध्यापक श्री. जयदेव देशपांडे पर्यवेक्षक श्री. पंकज मांडवगणे वर्गशिक्षक श्री.अर्पण तुपकर श्री.राजेंद्र कुरवाडे व शिक्षक वृंदांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ध्येयाचा ध्यास असेल तर कामाचा त्रास वाटत नाही राज्य पुरस्कार विजेते साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांचे प्रतिपादन

रांजणगाव् गणपती ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती: ध्येयाचा ध्यास असेल तर कामाचा त्रास वाटत नाही. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर माणूस अशक्य गोष्टीही शक्य करतो. परंतु त्यासाठी गरज असते ती म्हणजे अफाट मेहनतीची..! मंथन वेलफेअर फाउंडेशन माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी एक मोठे व्यासपीठ मिळत आहे. स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी म्हणून मंथन परीक्षेकडे पाहिले जाते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी मंथन वेलफेअर फाउंडेशनची सामान्य ज्ञान परीक्षा अत्यंत महत्त्वाची असून त्यातून शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी चांगल्या प्रकारे होत असल्याचे मत राज्य पुरस्कार विजेते साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी रविवार दिनांक १३ जुलै रोजी शिक्रापूर येथील भव्य साम्राज्य लॉन या ठिकाणी उपस्थित विद्यार्थी पालक आणि शिक्षकांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

अहिल्यानगर येथील मंथन वेलफेअर फाउंडेशन ही संस्था गेली पंधरा वर्षापासून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी कार्य करते. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी, त्यांची बैठक तयार व्हावी आणि त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा यासाठी ही संस्था मंथन सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करते. इतकेच नव्हे तर या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येते. यावर्षी या भव्य समारंभात अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध बालसाहित्यिक व साहित्य अकादमी पुरस्कार विजेते एकनाथ आव्हाड लाभले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर हे उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. यावेळी व्याख्याते शशांक मोहिते, राज्य समन्वयक संभाजीराव देशमुख, सोमनाथ कचरे, प्रीतम पाटील, अमोल दरेकर, मंदार कळमकर, शिल्पा महामुनी, श्रीकांत वेताळ आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे कोल्हापूर विभागाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी तुषार शिंदे यांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

मंथन वेलफेअर फाउंडेशन संचलित मंथन सामान्य ज्ञान परीक्षा विद्यार्थ्यांकडून चांगल्या प्रकारे स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतात त्यामुळे ग्रामीण भागात शिष्यवृत्तीत येणाऱ्या मुलांची संख्या सर्वाधिक आहे. या स्पर्धा परीक्षांच्या तयारीमुळे विद्यार्थ्यांची बैठक, परीक्षेची तयारी आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. सराव सातत्य आणि चिकाटी या गोष्टीमुळेच विद्यार्थी आपले ध्येय अचूक साध्य करतात.

सचिन बेंडभर
-राज्य पुरस्कार विजेते साहित्यिक शिक्षक

श्री स.भु. प्रशाला गोंदेगाव येथे शैक्षणिक वर्ष संपन्न

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



सोयगाव : सोयगाव तालुक्यातील गोदेगाव येथील सरस्वती भुवन प्रशालेत विविध शालेय समिती यांचे गठन करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले या सभेच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.योगेश इंगळे होते.तसेच सरपंच अतुल भाऊ बोरसे,पोलीस पाटील मनोहर निकम, डॉ.अविनाश जंजाळ,डॉ.श्रीमती संपदा जंजाळ, शालेय समिती सदस्य शरद निकम,आबाराव चौधरी, भागवत महालपुरे, सुधाकर महालपुरे, प्रशालेचे मुख्याध्यापक आर.एस.माळी, उपमुख्याध्यापक एस. आर.दाभाडे, पर्यवेक्षक जी.जी.ढाकणे होते.याप्रसंगी सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.सभेचे प्रास्ताविक करतांना प्रशालेचे मुख्याध्यापक श्री माळी यांनी मनोगतात आमची प्रशाला ही नवनविन उपक्रमांबरोबर शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. असे सांगितले व प्रशालेमध्ये राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांचे मार्गदर्शन केले. तसेच स्पर्धेच्या युगात प्रशालेतील विद्यार्थी टिकून राहावेत यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. तसेच बी. ई.महालपुरे यांनी या विविध समित्यानमध्ये पालकांनी हिरारीने भाग घ्यावा. यातुन विद्यार्थ्यांचे हित जोपासले जाते. असे सांगितले.सी.के. निकम यांनी समित्या स्थापन करण्याविषयी सविस्तर माहिती दिली. यानंतर सर्वानुमते समितींचे गठण करण्यात आले.यातप्रामुख्याने शिक्षक पालक समिती - उपाध्यक्ष महेंद्र प्रल्हाद पाटील, सहसचिव किशोर रमेश निकम माता पालक समिती - उपाध्यक्ष श्रीमती शितल संदीप सहाणे, सहसचिव - श्रीमती योगिता रविंद्र शिरसाठ यांची निवड करण्यात आली. तसेच विद्यार्थी सुरक्षा समिती, सखी सावित्री समिती, महिला अंतर्गत विशाखा समिती, परिवहन समिती या समित्यांचे सुद्धा गठण करण्यात आली

डॉ. योगेश इंगळे यांनी प्रशालेत उपलब्ध करून दिलेल्या सुविधांविषयी सविस्तर माहिती पालकांना दीली प्रशालेचा विकास होईल असे आवाहन केले. सभेस पालक उपस्थित होते.तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर सहकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन सी. के. निकम श्रीमती ए.आर पाटील यांनी केले. तर सुत्रसंचालन बजरंग व्यवहारे यांनी केले तर आभार पी. बी.चौधरी यांनी मानले.

सहा महिन्यापूर्वी मंत्र्याच्या हस्ते उद्घाटन झालेल्या स्टेडियमचे छत कोसळले.!

युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष किरण ठाकरे यांचा पत्रकार परिषदेत आरोप

गौळ ■ योगेश कांबळे



गौळ : नुकतेच १४.२९ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या विदर्भ केसरी रामदास तडस इनडोअर स्टेडियम चे छत कोसळल्याने देवळी नगर परिषदच्या भ्रष्टाचाराची आणखी एक लाजीरवाणी घटना समोर आली आहे. त्यामुळे देवळीकरांची सुरक्षितता प्रश्नचिन्हाखाली आली आहे. या स्टेडियमचे भव्य उद्घाटन फक्त सहा महिन्यांपूर्वी झाले होते, तेव्हा त्याच्या छताच्या इंटीरियरसाठी अतिरिक्त ५ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. या घटनेने स्टेडियमच्या दर्जाहीन बांधकामाचा बुरखा फाटला आहे. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही हे सुदैव. परंतु यामधून स्पष्ट होते की हे इंटिरियर डेकोरेशन अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून यामागे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष किरण ठाकरे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला आहे.

सुरुवातीपासूनच नागरिकांनी या स्टेडियमच्या ठिकाणाचा विरोध केला होता, कारण ते देवळीच्या ऐतिहासिक मैदानाच्या बलिदानावर उभारण्यात आले होते. त्यांच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करून प्रशासनाने हे स्टेडियम बांधले. ही पहिली घटना नाही; याआधीही सुद्धा येथील छताचे भाग दोन-तीन वेळा कोसळले आहेत. सुदैवाने या घटनेत मोठी दुर्घटना होण्याचे टळले.

नुकत्याच या स्टेडियममध्ये राष्ट्रीय महिला कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. हजारो नागरिकांच्या उपस्थितीत ही स्पर्धा झाली. दररोज संध्याकाळी येथे लहान मुले व महिलांची मोठी गर्दी असते. अशा परिस्थितीत निकृष्ट बांधकामामुळे मोठा अपघात घडू शकतो. विशेष म्हणजे, छत कोसळल्याबद्दल नगरपालिकेतील अभियंता व अधिकाऱ्यांना माहितीही नव्हती, हे अधिक धक्कादायक आहे. या घटनेमागे नगरपालिकेच्या भ्रष्ट व्यवस्थेचा व कमिशनखोरीचा हात आहे, अशी जनतेची तीव्र भावना आहे. देवळीत अशा निकृष्ट बांधकामांची यादी मोठी आहे. सध्या नगर भवनचे देखील बांधकाम सुरु आहे हे बांधकाम देखील लोकल रेती व चुरी चा वापर करून निकृष्ठ बांधकाम केल्या जात आहे मात्र या बांधकामाकडे देखील नगर परिषदेचे अधिकारी डोळेझाक करून या निकृष्ट बांधकामला मूकसंमती देत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे, ठेकेदार-अधिकाऱ्यांच्या सांठवाट्यामुळेच गुणवत्तेकडे दुर्लक्ष करून अशी बांधकामे केली जातात. देवळीकर आता विचार करत आहेत ही कमिशनखोरी आमचा पिच्छा कधी सोडणार? जनतेने सजग होऊन या भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध मोठ्या प्रमाणात आवाज उठवण्याची गरज आहे. अन्यथा, अशाच घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील आणि कोणाचा जीव गेला तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार? जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणात दखल घेऊन घटनेची व निकृष्ट कामाची चौकशी करून यात दोषी असलेल्या मुख्याधिकारी, अभियंता, व कामाच्या गुणवत्तेची पाहणी करणाऱ्या संबंधित दोषींविरुद्ध गुन्हा दाखल करून निलंबित करण्यात यावे व सर्व प्रमुख कामांचे स्पेशल ऑडीट करावे. ही मागणी युवा संघर्ष मोर्चा व देवळीकर नागरिक करीत आहे.

यावेळी प्रविण कात्रे, गौतम पोपटकर, स्वप्नील मदणकर, मंगेश वानखेडे, मनिष पेटकर, सागर पाटणकर, सुरज भगत व युवा संघर्ष मोर्चाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या घटनेनंतर नागरिक संघटना व स्थानिक नेते नगरपालिकेवर तपासाचा दबाव आणणार आहेत. स्टेडियमच्या बांधकामातील अनियमितता उघडकीस आणून जबाबदारांवर कठोर कारवाईची मागणी युवा संघर्ष मोर्चा च्या वतीने करण्यात येणार आहे.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील कामाचा तपासणी दौरा

भंडारा ■ प्रतिनिधी

भंडारा,:महात्मा गांधी रोजगार हमी योजना ची कामे तालुक्यातील विविध यंत्रणामार्फत होत असतात त्या यंत्रांची नावे पंचायत समिती,कृषी विभाग,फॉरेस्ट विभाग, व सामाजिक वनीकरण,या विभागांची विविध कामे केली जातात. लाखनी तालुक्याने मागील वर्षी २०२४- २५ मध्ये २०५७ इतकी कामे करून नऊ लाख २९ हजार इतका मनुष्य दिन निर्मिती केली आहे. २७ कोटी रुपयांची कामे लाखनी तालुक्यात करण्यात आली.

या कामांमध्ये जलसंधारणाची कामे वृक्षारोपणाची कामे व वैयक्तिक लाभाची कामे होत असतात .या कामांचे गुणवत्ता तपासणी करता उपायुक्त महात्मा गांधी रोजगार हमी योजना ,नागपूर अरविंद उपरीकर यांचा लाखनी तालुक्यातील केसलवाडा वाघ येथे तपासणी दौरा संपन्न झाला

यामध्ये त्यांच्यासोबत खोब्रागडे हे देखील उपस्थित होते तर तालुकास्तरावरून शसंदीप पानतावणे गटविकास अधिकारी नितीन राठोड कृषी अधिकारी आणि तहसीलदार धनंजय देशमुख उपस्थित होते. या तपासणी दौऱ्यामध्ये वृक्षारोपणाची कामे कोट्याची कामे व सिमेंट रोडची कामे पाहण्यात आली व कामाच्या गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत बांबू लागवड योजना देखील राबवली जाते .या योजनेअंतर्गत १००० झाडे जर यंत्रणांनी लावली तर पाच व्यक्ती यांना रोजगार उपलब्ध होणार आहे. याकरिता शेतकरी आपल्या कुटुंबासह आपल्या शेतात मजुरी करू शकतात .

या शेतकऱ्याच्या हातात जर पैसा आला तर तो शेतीचे विविध कामे चांगल्या प्रकारे करू शकतो त्यासोबत तो बांबूची लागवड करून दोन वर्ष अंतर पीक घेऊ शकतो व त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढ होऊन त्याची प्रगती साधल्या जाऊ शकते असे धनंजय देशमुख तहसीलदार ,लाखनी यांनी सोबत असलेल्या शेतकरी यांना सांगितले. या दौऱ्यामध्ये रोजगार सेवक व यंत्रणा प्रमुख कृषी सेवक कृषी पर्यवेक्षक तलाठी व तांत्रिक पॅनलचे सदस्य उपस्थित होते या सर्व लोकांचे स्वागत स्वप्निल बोरकर, सरपंच केसलवाडा वाघ यांनी केले . व केसलवाडा ग्रामपंचायत मध्ये चालूअसलेले महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे कामे अधिक सक्षमतेने पूर्ण करणाऱ्या बाबत विश्वास व्यक्त केला.

वरर्धपूर येथील पांदन रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान

साहुर सर्कल मध्ये चालु झाले ठेकेदारांचे राज्य

साहूर ■ शरद वरकड



साहुरः आष्टी तालुक्यातील वरर्धपूर या गावात शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी पांदन रस्ता तयार करणे चालू असुन ठेकेदाराच्या अलगरजीमुळे पांदनीला लागुन असलेले शेतकरी हिम्मतराव गाढवे यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे पांदन रस्ते हे शेतकऱ्यांच्या हितासाठी होत असल्याचे मत आमदार सुमित दादा वानखेडे यांनी व्यक्त केले आहे परंतु ठेकेदार मलाई खाऊन शेतकऱ्यांच्या जिवावर उठलेले आहेत पांदन रस्ता तयार करत असतांनाच ज्या ठिकाणी नैसर्गिक पाणी जाण्यासाठी सिमेंटच्या पायल्या टाकणे गरजेचे असुन सुद्धा या निष्क्रिय ठेकेदाराने पायल्या टाकल्या नसल्याने शेतकऱ्याच्या शेतात पाणी जमा होत असल्याने शेतातील पोटच्या मुलांप्रमाणे जपलेली मोसंबीची बाग शेवटचा श्वास घेत आहे याबाबत शेतकरी गाढवे यांनी पंचायत समिती आष्टी व तहसील कार्यालय आष्टी येथे लेखी तक्रार दाखल केली आहे परंतु यावर कुठलीही कारवाई झाली नसल्याने शेतकरी अडचणीत सापडलेला आहे या ठिकाणी ठेकेदाराचे राज्य आले असुन शेतकऱ्यांना मोठा फटाका बसत आहे ठेकेदाराच्या मर्जीनुसार काम होत असल्याने या कामाचे वरीष्ठ अधिकारी कुंभकरन अवस्थेत गेले असल्याचे चित्र दिसत आहे जर यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही तर सामाजिक संघटना सामोर येणार असुन अशा निष्क्रिय ठेकेदाराचे लायसन्स ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे मत व्यक्त केले आहे हे विशेष.

तालुका कृषी कार्यालयात पिक विमा सप्ताह बॅनरचे अनावरण!



गौळ ■ योगेश कांबळे

गौळ : देवळी येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे केंद्रशासना तर्फे राबविण्यात येणाऱ्या पिक विमा सप्ताह उपक्रमा अंतर्गत भारतीय कृषी विमा कंपनी तर्फे पिक विमा सप्ताह बॅनर चे अनावरण करण्यात आले. शेतकर्यांनी या पिकविमा योजनेअंतर्गत लाभ घेण्याचे आवाहन यावेळेस करण्यात आले.

कार्यक्रमाला तालुका कृषी अधिकारी कु.प्रतीक्षा आर. मेंढे,उप कृषी अधिकारी कु.अश्विनी बी. वैद्य व सर्व तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कर्मचारी तसेच शेतकरी वर्ग आणि भारतीय कृषी विमा कंपनीचे तालुका प्रतिनिधी योगेश कामनापुरे उपस्थित होते.

संभाजी ब्रिगेडचे नेते प्रवीण गायकवाड यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा विविध सामाजिक संघटनांकडून निषेध

कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर



कारंजा (घा.) संभाजी ब्रिगेडचे नेते प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे एका कार्यक्रमाला जात असताना काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी त्यांना एकटे गाठून भ्याड हल्ला केला. हल्लेखोर हे आधीच नियोजन करून धुंदीने आले होते आणि त्यांनी प्रवीण गायकवाड यांना गाडीच्या खाली उतरवून धक्काबुक्की करत त्यांच्या अंगावर शाई टाकली. या भ्याड हल्ल्याच्या कारंजा तालुक्यातील विविध सामाजिक व परिवर्तनवादी पुरोगामी संघटनांच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त केला.आणि सरकारने या हल्लेखोरांना ताबडतोब अटक करून कठोरात कठोर शिक्षा करावी अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

प्रवीण गायकवाड हे अनेक वर्षापासून संभाजी ब्रिगेड या संघटनेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा प्रचार आणि प्रसार करीत असतात. संपूर्ण महाराष्ट्रात तरुण पिढीला उद्योग, व्यवसाय, शिक्षण याचे मार्गदर्शन करत असतात. अशा व्यक्ती वर भ्याड हल्ला करून शाई फेक करने लाजीरवाणी बाब आहे.

या आशयाचे निवेदन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना कारंजा येथील तहसीलदार डॉ. हंसा मोहने यांच्या मार्फत देण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघ कारंजा, संभाजी ब्रिगेड, डॉ. पंजाबराव शिक्षक परिषद, राष्ट्रीय मुस्लिम सेवा संघ कारंजा, बुद्धिस्ट एम्प्लॉईज वेलफेअर असोसिएशन कारंजा, कारंजा नागरी समस्या संघर्ष समिती,सकल कुणबी मराठा वेल. फॉउंडेशन कारंजा तसेच विविध सामाजिक व पुरोगामी परिवर्तनवादी संघटनांनी यांनी निवेदन दिले. निवेदन देतेवेळी विविध सामाजिक संघटनांचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कारधा पोलिसांची अवैध रेती वाहतुकीवर मोठी कारवाई; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा : कारधा पोलिसांनी अवैध रेती वाहतुकीवर मोठी कारवाई करत एक ट्रॅक्टर-ट्रॉलीसह एकूण ६ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. शासनाचा महसूल बुडवून पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या एका आरोपीला याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. ही कारवाई दिनांक १५/०७/२०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास करण्यात आली.

कारधा पोलीस स्टेशनचे पथक हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, आरोपी सुदर्शन मधुसुदन मते (वय २२, रा. मंडणगाव) हा ट्रॅक्टर क्रमांक एम एच -३६-ए एल. ४५७० मधून विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून ५ लाख रुपयांचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर, १ लाख रुपयांची ट्रॉली आणि ६ हजार रुपये किमतीची एक ब्रास रेती असा एकूण ६,०६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस हवालदार दिलीप धावडे यांच्या लेखी तक्रारीवरून आरोपी सुदर्शन मते याच्याविरुद्ध कारधा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक ३४४/२०२५ अन्वये, भारतीय न्याय संहिता (भा.न्या.सं.) कलम ३०२(२), ४९, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४८(८) आणि पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम ७ व ९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नूरुल हसन, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे आणि पोलीस निरीक्षक सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास कारधा पोलीस स्टेशनचे अधिकारी करीत आहेत.

पोरवाल महाविद्यालयात कला शाखेच्या विद्यार्थ्यांचा परिचय कार्यक्रम संपन्न

कामठी ■ दिलीप येवले



कामठी : स्थानिक सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयात २०२४-२०२५ या शैक्षणिक सत्रात प्रवेश घेतलेल्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी परिचय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष स्वर्गीय श्री. सुनीलजी पोरवाल यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. महाविद्यालयातील विविध विषयांच्या विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्यांना विषय, अभ्यासक्रम, विभाग आणि स्वतःचा परिचय दिला. यामध्ये महाज्योती सेलचा डॉ. तुषार चौधरी, अर्थशास्त्र विषयाचा डॉ. रेणू तिवारी आणि डॉ. सिद्धार्थ मेश्राम, इंग्रजी विषयाचा प्रा. रेणुका रॉय, राज्यशास्त्र विषयाचा डॉ. यशवंत मेश्राम, उर्दू आणि उर्दू साहित्याच डॉ. अझहर अबरार, इतिहास विषयाचा डॉ. जितेंद्र सावजी तागडे, समाजशात्र विषयाचा डॉ. समृद्धी टापरे, मराठी विषयाचा डॉ. महेश जोगी, हिंदी विषयाचा डॉ. विकास कामडी, डॉ. दीपा चामट आणि प्रा. मीनाक्षी मेंढे यांनी गृहशास्त्रविषयाबद्दल माहिती दिली, डॉ. जयंत रामटेके यांनी क्रीडा आणि मनोरंजन विभाग आणि विषयातील अभ्यासक्रम आणि रोजगार याबद्दल माहिती दिली, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद शेंडे यांनी युनिटबद्दल माहिती दिली आणि केसरी वार्षिक मासिकाच्या संपादिका डॉ. गिजला हाश्मी यांनी केसरीबद्दल माहिती दिली. उपप्राचार्य प्रा. रेणू तिवारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की विद्यार्थ्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिक्षण घ्यावे. उपप्राचार्य प्रा. मनीष चक्रवर्ती यांनी विद्यार्थ्यांना नेहमीच स्वप्ने पाहण्याचा आणि ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याचा सल्ला दिला. महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य प्रा. स्वप्नील दाहात हत आपल्या अध्यक्षीय भाषणात 'आदर द्या, आदर घ्या' हा नारा दिला आणि म्हणाले की, तुम्ही विद्यार्थी खूप भाग्यवान आहात की तुम्हाला येथे पदवी पूर्ण करण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. जर विद्यार्थ्यांनी चांगल्या टक्केवारीने पदवी पूर्ण केली तर तुम्हाला भविष्यात चांगल्या नोकरीच्या संधी मिळू शकतात. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. रेणुका रॉय यांनी केले, कार्यक्रमाचे संचालन डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी केले तर आभार डॉ. विकास कामडी यांनी मानले. कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि कला शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने आमदार सुमित वानखडे यांचा कारंजा मध्ये जंगी सत्कार

कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर



कारंजा (घा): आर्वी विधानसभेतील तसेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी करिता पांदन रस्ता अत्यंत महत्त्वाचा असतो व सर्व शेतकऱ्यांची मागणी असलेला विषय आमदार सुमित वानखेडे यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून लावल्याने गोळीबार चौक कारंजा येथे समस्त कारंजा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला..

आमदार सुमित वानखेडे यांनी उचललेला पांदन रस्त्याच्या लक्षवेधीतील प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समितीची नेमणूक करून शेतकऱ्यांचा पांदन रस्त्याचा प्रश्न सोडवणार असल्याचे सांगितले. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीआमदार सुमित वानखेडे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की आपण मांडलेला प्रश्न हा महाराष्ट्रातील १५० आमदारांचा प्रश्न आहे त्यामुळे यावर उपाययोजना करण्यात येईल..

आमदार सुमित वानखडे यांचे महाराष्ट्रतून सर्वत्र कौतुक होत असताना गोळीबार चौक कारंजा येथे जि.प.माजी अध्यक्षा सरिता गाखरे, जि.प.माजी सदस्या रेवता धोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत कारंजा तालुक्यातील शेतकरी बांधवांतफे आमदार सुमित वानखेडे यांचा जंगी सत्कार करण्यात आला.

यावेळी युवा शेतकरी नितीन कडू यांनी आमदार सुमित वानखडे यांनी आर्वी विधानसभेतील व कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांना कशाप्रकारे अनेक योजनेच्या माध्यमातून लाभ मिळवून दिला तसेच कारंजा तालुक्यामध्ये सुमित वानखडे यांच्या माध्यमातून चालू असलेल्या अनेक विकासकामांचा आढावा सांगितला व बोलताना सांगितले की मी कुठल्याही पक्षाचा नसून आमदार सुमित वानखेडे यांच्या कामाने प्रभावित झालेला एक युवा शेतकरी आहे..

सत्काराला उत्तर देताना आमदार सुमित वानखडे यांनी सांगितले की शेतकऱ्यांच्या व विधानसभा क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील असून शेतकऱ्यांकरिता निरंतर काम करत राहू असे शेतकऱ्यांना अस्वस्थ केले..

कार्यक्रमाचे संचालन प्रेमसिंग महिले यांनी तर आभार प्रदर्शन चक्रधर डोंगरे यांनी केले.. कारंजा तालुक्यातील अनेक शेतकरी, भाजपा पदाधिकारी, जि.प.व पं.स.चें माजी सदस्य, कारंजा नगरपंचायत चे नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती होती..

उत्कृष्ट आरोग्य कर्मचारी देवेंद्र थेटे सन्मानित



विरुळ (आ.) ■ विनोद महाजन

विरूळ (आकाजी) : राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम व इतर आरोग्य विषयक कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार जिल्हा परिषद वर्धा येथे दि. ११ जुलै रोजी करण्यात आला, प्राथमिक आरोग्य केंद्र रोहणा अंतर्गत उपकेंद्र पाचोड येथील आरोग्य कर्मचारी श्री देवेंद्र थेटे यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पराग सोमन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले,

जिल्हा हिवताप व हत्तीरोग अधिकारी डॉ. नलिनी विखे जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हेमंत पाटील , जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ मंगेश रेवतकर यांच्या हस्ते आरोग्य कर्मचारी यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन आरोग्य मित्र गौरव विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला,

आरोग्य कर्मचारी हे आरोग्याचा कणा मानले जातात, गावागावात जाऊन गृहभेट देतात, त्यात लोकांना सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम अंतर्गत यांची माहिती व आरोग्य शिक्षण देतात, तसेच कुटुंब कल्याण अंतर्गत वर्धा जिल्ह्यातून द्वितीय पुरस्कार श्री. देवेंद्र थेटे आरोग्य कर्मचारी यांना मिळाला बाबत कौतुक होत आहे

स्वच्छतेत महाराष्ट्राची आघाडी : स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये मिरा-भाईंदर मनपा देशात प्रथम

वृत्तसंस्था ■ नवी दिल्ली





नवी दिल्ली : स्वच्छ भारत मिशन-शहरी अंतर्गत आयोजित 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५' मध्ये महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशात आपले वर्चस्व सिद्ध केले असून राज्याला एकूण दहा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यंदाच्या सर्वेक्षणात मिरा-भाईंदर महानगरपालिकेने देशात सर्वप्रथम क्रमांक पटकावत राज्याचा नावलौकिक वाढविला आहे.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते या राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी केंद्रीय गृहनिर्माण नगरविकास मंत्री मनोहर लाल आणि राज्यमंत्री तोखन साहू यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्याच्या नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, प्रधान सचिव नगरविकास विभाग-२ डॉ. के.एच. गोविंदराज, राज्य मिशन डायरेक्टर स्वच्छ महाराष्ट्र (शहरी) नवनाथ वाठ उपस्थित होते.

स्वच्छ शहरांच्या मूल्यांकनामध्ये (ठाणे जिल्हा) मिरा भाईंदर महानगर पालिकेने ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात देशात अव्वल स्थान मिळवले आहे. हा पुरस्कार नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह महानगरपालिकेचे आयुक्त राधा बीनोद शर्मा त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वीकारले.

कराड नगरपालिका देशात दुसरी

कराड नगरपालिकाने ५० हजार ते ३ लाख लोकसंख्येच्या गटात देशात दुसरे स्थान पटकावले आहे. हा पुरस्कार राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांच्यासह मुख्य अधिकारी प्रशांत वटकर यांनी स्वीकारला

नवी मुंबई महानगरपालिकेने 'सुपर स्वच्छ लीग सिटी' पुरस्कार पटकावला

१० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या गटात (ठाणे जिल्हा) नवी मुंबई महानगरपालिकेने 'सुपर स्वच्छ लीग सिटी' पुरस्कार पटकावला आहे. पुरस्कार राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांच्यासह आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी स्वीकारला.

५०,००० ते ३ लाख लोकसंख्येच्या गटात (पुणे जिल्हा) लोणावळा नगरपालिकाने, २०,००० ते ५०,००० लोकसंख्येच्या गटात (सांगली जिल्हा) विटा नगरपालिकाने, (पुणे जिल्हा) सासवड नगरपालिका आणि (अहिल्यानगर जिल्हा)देवळाली प्रवरानगर नगरपालिका , तर २०,००० पेक्षा कमी लोकसंख्येच्या गटात (सातारा) पाचगणी नगरपालिका आणि (कोल्हापूर)पन्हाळा नगरपालिका या शहरांनी सुपर स्वच्छ लीगमध्ये स्थान मिळवले.

(पुणे जिल्हा) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने देशात सातवा तर राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. तसेच ७ स्टार गार्बेज फ्री सिटी आणि वॉटर प्लस ही दोन्ही मानांकनंही मिळवली आहेत. नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी महानगरपालिका, नगरपालिकांच्या टीमसह पुरस्कार स्वीकारले.

मिरा-भाईंदर मनपाची अत्याधुनिक कचरा व्यवस्थापन प्रणाली

महाराष्ट्राने कचरा व्यवस्थापन, स्रोत पातळीवरील विलगीकरण, नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून स्वच्छतेच्या दिशेने उल्लेखनीय कार्य केले आहे. मिरा-भाईंदरने अत्याधुनिक कचरा व्यवस्थापन प्रणाली, मशीनद्वारे कचरा संकलन आणि नागरिकांमध्ये जनजागृती घडवून हे यश संपादन केले. पिंपरी-चिंचवडने कचरामुक्त शहर व वॉटर प्लस प्रमाणपत्र मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

स्वच्छता सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचा पाया

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या प्रगतीबाबत समाधान व्यक्त करत सर्व विजयी शहरांचे अभिनंदन केले. स्वच्छता ही केवळ शारीरिक आरोग्याचा नव्हे तर सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचा पाया असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी महिलांच्या वाढत्या सहभागाचे कौतुक करत ही चळवळ महिला सक्षमीकरणासाठी प्रभावी ठरत असल्याचे सांगितले. सफाईमित्रांचे योगदान उल्लेखनीय असून, मॅनहोलऐवजी मशीन-होलचा वापर वाढवण्याचेही त्यांनी आवाहन केले.

स्वच्छ भारत मिशन-शहरी २.० अंतर्गत देशभरातील ४,५०० हून अधिक शहरांचे १० महत्त्वपूर्ण निकषांवर मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये कचरा संकलन, स्रोत पातळीवरील विलगीकरण, पर्यावरणपूरक उपाययोजना, नागरिक सहभाग, आणि स्वच्छतेसंदर्भातील जनजागृती यांचा समावेश होता. 'रिड्यूस, रीयूज, रीसाइकल' ही या वर्षीची मध्यवर्ती संकल्पना होती. एकूण ३,००० हून अधिक मूल्यांकनकर्त्यांनी ४५ दिवसांच्या कालावधीत ११ लाखांहून अधिक घरे आणि परिसरांचे सर्वेक्षण केले असून १४ कोटी नागरिकांनी त्यात सहभाग नोंदविला आहे.

स्वच्छ सर्वेक्षण उपक्रम २०१६ पासून केंद्र शासनाने सुरू केला. हा उपक्रम शहरी स्वच्छतेचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ बनला आहे. या अंतर्गत महाराष्ट्रातील विविध शहरांनी दाखवलेली कामगिरी संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी ठरत असून, स्वच्छतेच्या दिशेने ही वाटचाल भविष्यातही वेगाने सुरू राहील, अशी अपेक्षा नगरविकास राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी यावेळी व्यक्त केली.

मालेगाव शहरातील सायझिंग उद्योगांची कार्यप्रणाली नियमबद्ध; नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई - पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मालेगाव शहरामध्ये कापडावर प्रक्रिया करणारे एकूण १५९ सायझिंग उद्योग सध्या कार्यरत असून, शहरातील वातावरण हवा गुणवत्ता ही सर्वसाधारणपणे 'मध्यम' स्तरावर आहे. पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि परवानगीविना चालणाऱ्या सायझिंग उद्योगांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

विधान परिषदेत सदस्य डॉ. परिणय फुके यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे मुद्दा उपस्थित केला होता. यावेळी प्रवीण दरेकर यांनी चर्चेत सहभाग घेतला.

या सायझिंग उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आवश्यक संमती प्रदान करण्यात आली असून, मालेगाव महानगरपालिकेचा ना-हरकत दाखला प्राप्त झाल्यानंतरच संमतीपत्र देण्यात आली आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उद्योगांमध्ये औद्योगिक कारणासाठी अल्प प्रमाणात पाण्याचा वापर केला जात असून, प्रक्रियेमध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रिया यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे. बॉयलरसाठी प्रामुख्याने लाकडाचा वापर केला जात असून, धुलीकण नियंत्रणासाठी डस्ट कलेक्टर व धुरांडे (चिमणी) बसविण्यात आल्या आहेत.

वातावरणीय हवा गुणवत्ता मापन केंद्र मालेगावमध्ये कार्यरत असून, प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सातत्याने तपासण्या केल्या जातात. यावेळी आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने, अवैधरित्या इंधन म्हणून प्लास्टिक स्क्रॅपचा वापर, तसेच सांडपाणी प्रक्रिया संयंत्रातील दोष यामुळे पुर्वी चार सायझिंग उद्योगांवर बंदी आदेश जारी करण्यात आले होते, अशी माहिती मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

धुळ्यात उद्योग विस्तारासाठी लॉजिस्टिक हब उभारणीला गती द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

धुळे महापालिकेच्या विविध प्रकल्पांबाबत विधानभवनात बैठक

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : धुळे शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार नागरी सुविधा आणि उद्योग विस्तारासाठी लॉजिस्टिक हब (ड्राय पोर्ट व स्टोरेजसाठी विशेष टर्मिनल) उभारणे अत्यावश्यक आहे. यासाठी तांत्रिक, आर्थिक व लॉजिस्टिक दृष्टीने व्यवहार्यता तपासावी व तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार हब उभारण्याच्या कार्यवाहीस गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

धुळे महापालिकेच्या विविध प्रकल्पांबाबत विधानभवन येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वनमंत्री गणेश नाईक, आमदार अनुप अग्रवाल, अपर मुख्य सचिव असिम गुप्ता, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, धुळे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, धुळे येथे उद्योगांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच देवपूर, वलवाडी व सखल भागात पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करण्यासह आपत्ती व्यवस्थापन विभागाशी समन्वय साधावा. धुळे शहराचा विस्तार आणि लोकसंख्या वाढ लक्षात घेऊन डीआय पाईपलाईन टाकणे, औद्योगिक प्रकल्पांसाठी सौर प्रकल्प बॅटरी स्टोरेजसह उभारणे, भुयारी मलनिस्सारण योजनेसाठी निधी मंजूर करणे याबाबतही सूचना दिल्या. तसेच, धुळे शहरास दरवर्षी पाणी वितरण व पथदिव्यांसाठी ३२ ते ३३ कोटी रुपयांचा वीज खर्च होत असून, हा भार कमी करण्यासाठी योग्य जागेवर सौर प्रकल्प उभारावेत. शहराचा विस्तार ४६.४६ चौ.कि.मी. वरून १०१.०८ चौ.कि.मी. पर्यंत झाला आहे. त्यामुळे वाढलेल्या हद्दीतील मुलभूत सोयींसाठी नगरोत्थान योजनेतून निधी मंजूर करावा, अशीही सूचना त्यांनी दिली.

याशिवाय, चाळीसगाव रोडलगत म्हाडाच्या जागेवर शॉपिंग सेंटर उभारणे आणि मौजे धुळे येथे नोकरदार महिलांसाठी वसतिगृह बांधण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

कृषिमाल खरेदी करूनही बिले न देणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करण्याचे कृषिमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांचे निर्देश

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : नाशिक येथील उमराणे रामेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील शेतकऱ्यांना कांद्याचे थकीत बिले अदा करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले आहेत. संचालक मंडळ, उपनिबंधक कार्यालय आणि व्यापारी यांच्यात समन्वय साधून यासंदर्भात उपाययोजना करावी आणि ४५ दिवसांच्या आत याबाबतचा अहवाल सादर करावा, असे निर्देशही श्री. रावल यांनी दिले.

विधान भवन येथे नाशिक येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले.

पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, संबंधित प्रकरणात एका व्यापाऱ्याच्या मृत्यूनंतर १२५ शेतकऱ्यांना एक कोटी पन्नास लाख रुपये देणे बाकी होते. त्यापैकी २५ लाख रुपये अदा करण्यात आले असून उर्वरित रक्कम तातडीने देण्याची गतीने कार्यवाही करावी. तसेच इतर २० शेतकऱ्यांचे एक कोटी तेरा लाख रुपये थकीत आहेत. या रकमेच्या वसुलीसाठी संचालक मंडळ आणि उपनिबंधक कार्यालयाने त्वरित उपाययोजना आखावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

खासगी बाजार समित्यांवर पीएमसीप्रमाणे नियम लागू करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल. शेतकऱ्यांचा कृषी माल खरेदी केल्यानंतर निर्धारित कालमर्यादेत पैसे देणे बंधनकारक असून याचे काटेकोर पालन केले जाईल.

बैठकीत कृषिमंत्री ?ड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले की, ज्या व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची थकीत बिले दिली नाहीत पण कृषी मालाची खरेदी सुरू ठेवली आहे, अशा व्यापाऱ्यांचे परवाने तत्काळ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात यावा. तसेच बाजार समित्यांनी शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय होऊ नये याची खबरदारी घ्यावी.

या बैठकीला आमदार डॉ. राहुल आहेर, माजी आमदार कोतवाल, प्रधान सचिव प्रवीण दराडे, पणन सहसंचालक स्नेहा जोशी, जिल्हा उपनिबंधक फयास मुलाणी आणि शेतकरी उपस्थित होते.

नागपूर-अमरावती जिल्ह्यातील नझूल निवासी भूखंडधारक अभय योजनेला ३१ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ : महसूलमंत्री बावनकुळे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : नागपूर आणि अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेपट्ट्यावर दिलेल्या नझूल भूखंडांसाठी लागू करण्यात आलेल्या अभय योजनेला ३१ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

विधान भवनात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात आयोजित बैठकीस आमदार प्रवीण दटके, नागपूरचे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी उपस्थित होते.

नझूल भूखंड हे ब्रिटिशकालीन असून, शासनाने हे भूखंड निवासी आणि इतर प्रयोजनांसाठी भाडेपट्ट्यावर दिले होते. मात्र, कालांतराने या भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण, हस्तांतरण आणि वारस नोंदणी यांसारख्या बाबींमध्ये मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. मूळ भाडेपट्टेदार हयात नसणे, कागदपत्रांची अपुरी उपलब्धता आणि प्रशासकीय किचकट प्रक्रिया यामुळे अनेक भूखंडधारक कायदेशीर अडचणीत सापडले होते. यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने वेळोवेळी उपाययोजना केल्या, परंतु प्रश्न पूर्णपणे सुटला नव्हता. याच पार्श्वभूमीवर, नझूल भूखंडधारकांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने अभय योजना आणली. या योजनेद्वारे प्रलंबित भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण, दंडात सवलत आणि इतर कायदेशीर प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, अनेक नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यास पुरेसा वेळ मिळाला नव्हता, त्यामुळे मुदतवाढ देण्याची मागणी सातत्याने होत होती.

या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नझूल भूखंडांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यास मदत होणार असून, नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७ मध्ये 'आयएसओवा' सक्रीय सहभागी : आयएसओवाचे अध्यक्ष अर्चना मीना

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : सक्षमता, ज्ञान आणि अनुभवाची जोड देऊन आपण सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात पूर्ण क्षमतेने योगदान देण्यास सक्षम आहोत. विकसित महाराष्ट्र २०४७ या राज्याच्या भविष्योन्मुख आराखड्यात सक्रीय सहभागी होणे हे आपले सामाजिक उत्तरदायित्व असल्याचे मत आयएसओवा (द्वैएँ) च्या नव-निर्वाचित अध्यक्ष अर्चना मीना यांनी व्यक्त केले.

भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी आणि त्यांच्या सहचारिणींच्या संघटनेची (आयएसओवा) वार्षिक सर्वसाधारण सभा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झाली. या संघटनेतर्फे सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि मनोरंजन क्षेत्रात विविध उपक्रम राबवले जातात. या सभेला माजी मुख्य सचिव तथा पूर्व अध्यक्षा सुजाता सौनिक, सचिव आर. विमला, खजिनदार झेबा नायक उपस्थित होते.

अध्यक्ष अर्चना मीना म्हणाल्या की, नंदघर योजनेअंतर्गत पाच अंगणवाड्या दत्तक घेता येतात. केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनांच्या सहाय्याने ग्रामीण आणि शहरी भागांना जोडण्यासाठी आयएसओवा च्या माध्यमातून कार्य केल्यास विद्यार्थ्यांना मोठा लाभ होईल. दूरदृष्टी आणि सकारात्मक विचारांनी ग्रामीण भाग शहराशी जोडण्याचे काम आपण करू शकतो. तसेच महिला बचत गटांना अधिक व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी 'आयएसओवा' मार्फत प्रयत्न केले जातील.

माजी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी सांगितले की, 'आयएसओवा' अंतर्गत पर्यावरण, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले जात आहे. सकारात्मक इच्छाशक्तीने आपण समाजात सक्रीय बदल घडवू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सचिव आर. विमला यांनी 'आयएसओवा'च्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या बालकांना आरोग्य चिकित्सेसाठी आर्थिक सहाय्य करण्यात आले असून, जे.जे. रुग्णालयात डोनोमीटर मशीन देण्यात आले आहे. शिक्षणासाठी टॅबचे वाटप करण्यात आले आहे. 'आयएसओवा'च्या बालवाडीत लहान मुलांना मोफत उत्तम शैक्षणिक साहित्य आणि सुविधा पुरवल्या जातात. तसेच कर्णबधीर मुलांना आर्थिक सहाय्य दिले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी बालवाडी बद्दल रश्मी यादव यांनी माहिती दिली तर सुप्रिया चंदगल यांनी सूत्रसंचालन केले. द्वैएँ च्या सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुनर्विकास योजनेतील खोल्या दहशतीने विक्री प्रकरणी 'आयपीएस' अधिकाऱ्यामार्फत चौकशी : मंत्री शंभूराज देसाई

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : विलेपार्ले (पश्चिम) येथील प्रेमनगर गृहनिर्माण संस्था, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत गरीब झोपडीधारकांच्या खोल्या धमकावून, दबाव टाकून परस्पर विक्री केल्याच्या प्रकरणाची भारतीय पोलीस सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी केली जाईल, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य श्रीमती मनीषा कायंदे यांनी याबाबत लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केली होती.

मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले की, या योजनेचे विकासक यांनी सुरुवातीला केवळ दोन वर्षे भाडे दिल्यानंतर, पुढील सहा वर्षांत कोणतेही भाडे दिलेले नाही. अधिवेशनात नुकत्याच मंजूर करण्यात आलेल्या विधेयकातील तरतुदीनुसार, अशा विकासकांवर भाडे वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

या योजनेला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मंजुरी मिळाली असून, एकूण १४०७ झोपडीधारकांपैकी ७५३ झोपडीधारक पात्र ठरले आहेत. अधिक रहिवासी पात्र आहेत का याबाबत तपासणी केली जाईल, असेही मंत्री देसाई यांनी स्पष्ट केले.

योजनेतील पुनर्वसन इमारतीचे तळमजला अधिक १२ मजले एवढ्या उंचीचे आराखडे मंजूर करण्यात आले असून, सद्यस्थितीत जोत्यापर्यंतचेच बांधकाम पूर्ण होऊन त्यानंतर काम बंद आहे. ही परिस्थिती गंभीर असून, शासनाने याची दखल घेतली आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242